महाराष्ट्रातील निर्भिड साप्ताहिक

रविवार जगमित्र

Jagmitra2010@gmail.com ● मा.संपादक : कृष्णा कडबाने 7030908787 ● निवासी संपादक : मकरंद जाहागीरदार 9422216061, 9371591760 ● कार्यकारी संपादक : शेख बिलाल 9422404740 www.jagmitra.com

■ बीड (महाराष्ट्र) ■ वर्ष ०२ ले ■ अंक ०३ ■ रविवार दि.२२ नोव्हेंबर २०२६ ■ PRGI.No.MHMAR/25/A3358 ■ पाने ६ ■ किंमत : ३ रू.

भूममध्ये बिबट्याचा धिंगाणा,वनविभाग मात्र कोमात!

शेतकरी जीव मुठीत धरून,वनविभाग मात्र पोकळ सल्ल्यांत मशगूल!

भूम/जगमित्र न्यूज

भूम तालुक्यात बिबट्याने अक्षरशः धुमाकूळ घातला असून, शेतकऱ्यांच्या पशुधनाचा रोज बळी जात आहे. मात्र, बिबट्याचा बंदोबस्त करण्यात वनविभाग सपशेल अपयशी ठरल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरे लावले आहेत, असे पोकळ दावे करणाऱ्या वनविभागाला बिबट्याने पुरते नाकीनऊ आणले आहे. सलग दुसऱ्या दिवशी कासारी येथे वासराचा फडशा पाडून बिबट्याने वनविभागाच्या ढिसाळ नियोजनाची लक्तरे वेशीवर टांगली आहेत. त्यामुळे आता भूमचे वनपरिक्षेत्र अधिकारी कुटे हेच स्वतः नागरिकांच्या आणि शेतकऱ्यांच्या संतापाच्या रेंजमध्ये आले आहेत! बुधवारी बन्हाणपूर येथील शेतकरी बिभीषण वारे यांच्या दोन वासरांवर हल्ला करून बिबट्याने आपली दहशत निर्माण केली होती. या घटनेची शाई वाळते न वाळते तोच, गुरुवारी (ता. १९) मध्यरात्री कासारी येथील शेतकरी तुळशीराम पाटोळे यांच्या गोठ्यातील वासरावर बिबट्याने झडप घालून त्याला ठार केले. वनविभाग एका गावात पिंजरा लावून गाफील राहते, तोच बिबट्या दुसऱ्या गावात जाऊन शिकार करतो. (पान २ वर)



मनुष्यहानी झाल्यावरच वनविभागाला जाग येणार का?

बन्हाणपूर आणि कासारी या दोन्ही घटनांनी संपूर्ण तालुका हादरला आहे. बिबट्याचा वावर थेट मानवी वस्ती आणि गोठ्यांपर्यंत पोहोचला आहे. एखाद्या निष्पाप शेतकऱ्याचा किंवा ग्रामस्थाचा बळी गेल्यावरच वनविभागाला आणि वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना जाग येणार का? असा संताप व्यक्त होत आहे. आम्हाला वनविभागाचे पोकळ सल्ले नकोत, तर बिबट्या पिंजऱ्यात हवा! तात्काळ गस्त वाढवा, आधुनिक ट्रॅप कॅमेरे लावा आणि या नरभक्षक होण्याच्या मार्गावर असलेल्या बिबट्याचा कायमचा बंदोबस्त करा; अन्यथा वनविभागाच्या कार्यालयावर धडक मोर्चा काढू, असा आक्रमक इशारा संतप्त शेतकरी आणि ग्रामस्थांनी दिला आहे.

जनतेच्या मनातील 'राजे', आता 'नामदार' व्हावेत!



बालमैत्रीपासून जननेतृत्वापर्यंतचा प्रवास;विजय सिंह पंडित यांची यशस्वी वाटचाल

बीड: काही माणसांची ओळख त्यांच्या पदामुळे निर्माण होते, तर काहींची ओळख त्यांच्या स्वभावामुळे, कर्तृत्वामुळे आणि माणसांशी जपलेल्या नात्यांमुळे अधिक मोठी होत जाते. विजय सिंह पंडित हे असेच एक व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्याशी माझे नाते केवळ राजकीय सहकाऱ्याचे नाही, तर बालपणापासूनच्या मैत्रीचे आहे. त्यांच्या आयुष्यातील विविध टप्पे जवळून पाहताना, त्यांच्यातील नेतृत्वगुण, निर्णयक्षमता, मित्रांसाठी जीव ओतून उभे राहण्याची वृत्ती आणि सामान्य माणसाशी असलेली घट्ट नाळ यांचा नेहमीच प्रत्यय आला.शालेय जीवनापासूनच विजय सिंह यांच्या व्यक्तिमत्त्वात नेतृत्वाची बीजे दिसत होती. मित्रांना सोबत घेऊन चालणे, एखाद्या गोष्टीसाठी पुढाकार



घेणे, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे आणि स्वतःच्या माणसांसाठी ठामपणे उभे राहणे, हे गुण त्यांच्यात अगदी लहान वयातच होते. मैत्री जपताना ते कधीही स्वार्थाचा विचार करत नाहीत. जीवाला जीव देणारा मित्र म्हणून त्यांची ओळख आजही कायम आहे. शालेय जीवनानंतर महाविद्यालयीन वाटचालीतही त्यांची हीच धडाडी, आत्मविश्वास आणि नेतृत्वाची झलक कायम पाहायला मिळाली. आमच्या मैत्रीचा राजकीय प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे आम्ही दोघांनी एकत्र लढवलेली पहिली निवडणूक. विजय सिंह यांनी जातेगाव पंचायत समितीमधून निवडणूक लढवली, तर मी बीड नगर परिषदेत नगरसेवक पदासाठी निवडणुकीच्या (पान २ वर)

धनंजय मुंडेंनी स्वतःच ट्रॅक्टर चालवत केला गाळपेरा

परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी) – माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी आज परळी तालुक्यातील नागापूर येथील वाण धरण येथे गाळ पेरा पेरणीचा शुभारंभ करताना स्वतःच ट्रॅक्टर चालवत गाळ पेरा केला.

यावर्षी पडलेल्या भीषण दुष्काळाच्या परिस्थितीत विविध उपाययोजना शासन स्तरावरून राबविण्यात येत असून, परळी तालुक्याची जलवाहिनी असलेल्या वाण धरणाच्या गाळमध्ये गाळ पेरा करण्याचा शुभारंभ धनंजय मुंडे यांच्या हस्ते व पदाधिकारी तसेच विविध विभागाच्या अधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी धनंजय मुंडे गाळ पेऱ्याचे उद्घाटन प्रत्यक्ष गाळ पेरा करूनच केले पाहिजे, आहे म्हणत ते थेट ट्रॅक्टर वर चढले आणि पाहता पाहता त्यांनी स्वतःच तलावाच्या गाळाच्या जमिनीमध्ये ट्रॅक्टराद्वारे गाळ पेरा केला.तरुण सरपंचाचा धाडसी निर्णय अन् ७ एकर ऊस दिला जनावरांच्या चाऱ्यासाठी मोफत त्याआधी धनंजय मुंडे यांनी परळी



तालुक्यातील पाडोळी येथे मोफत ऊस चारा वाटप उपक्रमाचे उद्घाटन केले.पाडोळी गावचे युवा सरपंच सोनू कराड यांनी दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आपल्या शेतातील उभा ७ एकर ऊस जनावरांच्या चाऱ्यासाठी मोफत दिला असून सोनू कराड यांच्या ऊस शेतीला चारा छावणीचे स्वरूप प्राप्त झाल्याचे पाहायला मिळाले. यावेळी धनंजय मुंडे यांनी सोनू कराड यांच्या दातृत्वाचे कौतुक केले. तसेच दुष्काळी परिस्थितीत ज्याला शक्य आहे त्यांनी आपापल्या परीने मदत करण्याचे आवाहन केले.





page 2_Layout 1 11/22/2026 12:21 AM Page 1

जगमित्र विशेष संपादकीय

परंपरेचा धूर!

अजिबात पाळले जाणार नाहीत असे आदेश देण्याचे आणि त्या आदेशांचे उल्लंघन होताना त्याकडे मसुख दु:खे समे कृत्वाःफवृत्तीने तटस्थपणे पाहण्याचे आपल्या न्यायपालिकेचे औदार्य वादातीत खरेच. या उच्च कोटीच्या न्यायालयीन उदारमतवादासमोर नतमस्तक होऊन दीपावलीचा आनंद द्विगुणित अथवा त्रिगुणित करणाऱ्या आगीच्या घटनांवर आपण त्याच निर्विकारपणे भाष्य करू या. त्याआधी न्यायपालिकेचे आभार आभार मानावे तितके कमीच. ते मसव्वासो क्रोरफ (की एकसोचालीस क्रोर?) भारतीयांस इतक्या सुलभपणे निष्काम कर्मयोगाचे धडे आपली न्यायपालिका घालून देते यासाठी. आदेश देणे हे न्यायपालिकेचे कर्तव्य. ते पार पाडल्यानंतर या आदेशाची अंमलबजावणी होते किंवा कसे यात लक्ष घालणे म्हणजे पोर जन्मास घातले म्हणून त्यावर आयुष्यभर मालकी सांगत राहणे. हे न्यायपालिकेस उमगते. म्हणून न्यायपालिका आपल्या आदेशांकडे गंगेत सोडल्या जाणाऱ्या दिव्यांकडे ते सोडणाऱ्याने पाहावे तसे पाहाते. दिवा लावला, गंगार्पणमस्तु म्हणत तो पाण्यात सोडला की झाले. आता त्याचे काय होणार या विचारात जीव गुंतवायचा नाही हा उदात्त विचार आपल्या न्यायालयीन आदेशात हमखास दिसतो. गणेशमूर्ती प्लास्टर ऑफ पॅरिसच्या नकोत, शाडूच्या मातीच्या हव्यात असा आदेश द्यावयाचा. पण गणेशागमनाआधीच त्या आदेशाचे विसर्जन होताना पाहायचे. गणेशमूर्तींच्या उंचीबाबत काहीबाही नियम घालून द्यायचा. मग त्याच नियमांची पायमल्ली होताना पाहात गगनभेदी मूर्तीसमोर नतमस्तक व्हायचे. दिवाळीत कानठळी आवाजाच्या फटाक्यांवर बंदी असे बजावायचे आणि मग त्या बंदीच्या चिंधड्या होत असतानाचा दणदणाट कानात बोटे घालून सहन करायचाः हे अंत:करण विशाल असल्याखेरीज अजिबात शक्य नाही. म्हणून अशा स्थितप्रज्ञतेचा धडा देशवासीयांस घालून देणाऱ्या न्यायपालिकेचे आभार मानून दीपोत्सवाच्या आनंद समीक्षेकडे वळू या. यंदाचा दीपोत्सव खास खरा. अमेरिकेत भारत-मित्र डोनाल्ड ट्रम्प यांच्या वा दुसरे भारत-मित्र इस्रायलचे पंतप्रधान नरसंहारी नेतान्याहू यांच्या कापल्या गेलेल्या नाकांमुळे असेल बहुधा; यंदा भारतवर्षातील दीपावलीत जनसामान्यांचा आनंद गगनात मावत नव्हता. पूर्वी राजे-महाराजे आनंदाच्या प्रसंगी भांड्याचे आवाज (पक्षी: तोफा उडवत) वा शोभेच्या दारूची आतषबाजी करीत. कालौघात राजेशाही गेली. लोकशाही आली. या लोकशाहीत नागरिकांस राजा (पाहा : मतदारराजा, ग्राहक राजा, बळीराजा इत्यादी) म्हटले जाते. ते खरे मानल्याने पूर्वीच्या राजेरजवाड्यांची आनंदोत्सवाची सवय या लोकशाहीतील राजा म्हणवून घेणाऱ्या नागरिकांत उतरली. म्हणून वाढदिवस असो की घरात कोणाचे शुभमंगलः इतरांस कानठळ्या बसवणारा फटाक्यांचा दणदणाट हवाच हवा. दळणवळणाच्या साधनांचा कितीही विकास होऊन शुभवर्तमान इतरांस कळविण्यासाठी नवनवी आयुधे विकसित होवोत. राजेमहाराजांची दवंडीची, तोफांचा बार उडवण्याची परंपरा कायम टिकायला हवी. हीच बाब आतषबाजीसही लागू होते. पूर्वी राजेमहाराजांच्या काळी रात्री अंधार असे. पलिते वा मेणबत्यांचा प्रकाश पडून पडून पडणार किती? आणि कुठवर? म्हणून समस्त नगरवासीयांस काही शुभवार्ता कळवण्याच्या उद्देशाने आतषबाजी केली जात असे. काळ बदलला. आता प्रकाशाचे कितीही झोत सोडले तरी अंधार शोधू म्हणता सापडणार नाही, अशी स्थिती. त्यामुळे सांप्रती आतषबाजी ही कल्पनाच निरर्थक. काळ्याकुट्ट आकाशात, अमावस्येच्या पूर्वसंध्येस मिणमिणत्या तारकांच्या पार्श्वभूमीवर आणि जमिनीवरही तशाच मिणमिणत्या पणत्यांच्या सान्निध्यात आतषबाजीने उजळणारे आकाश वेगळाच आनंद देते, हे खरे. आता सतत-अतिप्रकाशी आकाशाने तो आनंद हिरावला त्यासही काळ लोटला. पण परंपरेचा आदर करायलाच हवा. त्यासाठी मग अतिउजळत्या आकाशात अतिअतिउजळते अग्निदिवे, अग्निबाण सोडायलाच हवेत. त्याच परंपरेचे पालन भावी महासत्तेतील जनता करीत असेल तर तिला दोष का बरे द्यावा? आणि ही परंपरा तोडण्याचा आदेश जर मुंबई महापालिका देत असेल तर त्या आदेशाचे पालन तरी का बरे व्हावे? भले अनेक इमारतींस आगी लागू देत. त्या आगी विझवताना अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांची त्रेधातिरपीट उडू दे. त्यांची कमतरता भासू दे. अग्निशमन केंद्रासाठी आरक्षित जागेवर टोलेजंग इमारती उभ्या राहून त्याच इमारती पेटू देत. ती विझवण्यासाठी आवश्यक शिड्या, पाणी आणि मुख्य म्हणजे प्रशस्त मार्गही अग्निशमन दलाच्या वाहनांस नसू दे. पण दिवाळीची आतषबाजीची परंपरा सुरू राहायला हवी म्हणजे हवीच. पूर्वी उंच इमारती अशा नव्हत्याच. चाळी वा दोन-तीन मजली इमारती. त्यामुळे अग्निबाण त्यांच्या वर जाऊन फुटत. पण अग्निबाण कर्त्यांनी काळाची पावले ओळखली नाहीत. त्यामुळे आताशा अगदी शंभर-शंभर मजली इमारती गल्लीबोळांत उभ्या राहू लागल्या तरी अग्निबाणांचा जीव काही दोन-पाच मजल्यांवर जात नाही, हे कसे? देशाची उंच उंच होणारी प्रगती या अग्निबाण निर्मात्यांनी पाहिलेली नाही, हा अक्षम्य गुन्हाच. त्याचमुळे ते खुज्या उंचीचे फटाके तयार करत राहिले. यामागे चीनचा कावा असेल काय? कदाचित असेलही. कारण अन्य अनेक घटकांप्रमाणे आपले फटाके देखील चीन-निर्मित. ते त्यांच्यासारखेच बुटके. त्यांस भारतीयांची वाढती उंची कशी दिसणार? कदाचित यामागे चिनी कावाही असू शकेल. भारतास बुटके अग्निबाण पुरवून आगीच आगी लावून द्यायच्या असा चिनी विचार त्यामागे नसेल असे छातीठोकपणे सांगता येणे अवघड. काहीही असो. म्हणून आपल्या इमारतींची उंची पार करून जाऊ शकतील असे अग्निबाण, अग्निदिवे बनवण्यासाठी आपण आत्मनिर्भरता साध्य करायला हवी, हा यातील धडा. त्यासाठी ममाझी माती, माझा फटाकाफ, ममाझी माती, माझा लक्ष्मीबारफ, ममाझी माती, माझा बाणफ असे कार्यक्रम सरकारने द्यावेत. स्वदेशी धुराचा आनंद वेगळाच. जे जे स्वदेशी ते ते उत्तम. मग दवा असो वा दारू (फटाक्याची)! या स्वदेशी फटाक्यांच्या धुराने नागरिकांचे श्वास कोंडले, प्रदूषणाची पातळी मोजण्याच्या मर्यादा ओलांडून गेली आणि खोकल्याची साथ पसरून खोकून खोकून नागरिकांच्या छातीच्या पिंजऱ्यांचे खुळखुळे झाले तरी हरकत नाही. त्यासाठी वाटल्यास ममाझी माती; माझा धूरफअशी घोषणा देता येईल. पण फटाक्यांच्या निर्मितीत आत्मनिर्भरता हवीच हवी. या फटाक्यांनी प्रदूषण होऊन नागरिकांत खोकल्याची साथ पसरल्यास देशी दारूवर (फटाक्यांची) देशी दवा पुरवण्यास आपले अनेक बाबा, बापू सज्ज आहेत. काळजी नसावी. प्रदूषण हे काय क्षणिक असते. पण परंपरा अनंत काळची असते. तिचा सन्मान ठेवायला हवा. आंग्ल विद्याविभूषित शास्त्रज्ञांस हे काही कळत नाही. ते आपले प्रदूषणाच्या नावे बोटे मोडतात. या प्रदूषणचिंतातुरांस उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी ठणकावले ते बरे झाले. प्रदूषणासाठी फटाक्यांस बोल लावणाऱ्यांच्या कानाखाली आदित्यनाथांनी योगिक फटाका फोडला. फटाक्यांविरोधात इतका बभ्रा ? त्यामुळे प्रदूषण वाढले तर त्याचा इतका बाऊ ? प्रदूषणच ते; होईल दूरफफ्रहा त्यांचा योगिक सल्ला देशवासीयांनी शिरसावंद्य मानायला हवा. त्याची दखल देशाची न्यायपालिकेनेही घ्यायला हवी. तसे झाल्यास उगाच प्रदूषण कमी करण्यासाठी न पाळले जाणारे आदेश जारी करण्याच्या निष्काम कर्मात न्यायपालिका वेळ दवडणार नाही. हा वेळ अन्य क्षेत्रात न पाळले जाणारे आदेश देण्यासाठी सत्कारणी लावता येईल. तेव्हा आगी लागोत वा अन्य उत्पात होवोत. फटाक्यांच्या उदात्त परंपरेचे अधिक जोमाने पालन करणे हे आपले कर्तव्य. या परंपरेच्या धुराने फुफ्फुसे निकामी होऊन प्राण गेले तरी बेहत्तर. परंपरा टिकणे महत्त्वाचे. माणसे काय अशीही मरणारच. परंपरा जिवंत राहायला हवी.

पान १ वरून...

भूमध्ये बिबट्याचा धिंगाणा,वनविभाग मात्र कोमात!

वनविभागाचे पिंजरे म्हणजे केवळ शोभेचे बाहुले ठरत असून, या बिबट्याला जेरबंद करण्याची धमक प्रशासनात उरली आहे की नाही, असा संतप्त सवाल ग्रामस्थ विचारत आहेत. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे अर्थकारण हे शेती आणि पशुधनावर अवलंबून आहे. बिबट्याच्या हल्ल्यात वासरे दगावल्याने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. रात्री-अपरात्री शेतात पिकांना पाणी देणे आणि जनावरांची राखण करणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण देण्यासारखे झाले आहे. शेतकरी जीव मुठीत धरून रात्र जागून काढत असताना, वनविभाग मात्र केवळ सतर्क राहा असे पोकळ सल्ले देऊन आपली जबाबदारी झटकत असल्याचा आरोप होत आहे.

जनतेच्या मनातील 'राजे', आता 'नामदार' व्हावेत!

मैदानात उतरलो. विशेष म्हणजे, दोघांचाही विजय झाला. त्यांच्या निवडणुकीत मी त्यांच्या प्रचारासाठी झटलो, तर माझ्या निवडणुकीत ते माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. ही केवळ राजकीय देवाणघेवाण नव्हती, तर मैत्रीच्या विश्वासाची आणि एकमेकांसाठी उभे राहण्याच्या भावनेची साक्ष होती.विजय सिंह यांचा सार्वजनिक जीवनातील प्रवास हा खऱ्या अर्थाने लोकांमधून घडलेला प्रवास आहे. पंचायत समिती सदस्य, सभापती, जिल्हा परिषद सदस्य, जिल्हा परिषद सभापती, जिल्हा परिषद अध्यक्ष आणि आता आमदार, असा त्यांचा प्रवास अनेक जबाबदाऱ्यांच्या अनुभवातून समृद्ध झाला आहे. प्रत्येक पदावर काम करताना त्यांनी ग्रामीण भागातील प्रश्न, सामान्य नागरिकांच्या अडचणी, विकासकामांची गरज आणि प्रशासनाकडून अपेक्षित असलेली कार्यक्षमता यांचा जवळून अभ्यास केला. त्यामुळे आज जनतेच्या समस्या समजून घेताना त्यांना नव्याने काही शिकण्याची गरज पडत नाही; प्रश्नांची जाणीव, त्यांचे गांभीर्य आणि त्यावर उपाय शोधण्याची दिशा त्यांच्या अनुभवातून तयार झाली आहे.त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे जनतेशी असलेली घट्ट जोड. लोकांच्या सुख-दुःखात सहभागी होणे, कार्यकर्त्यांना विश्वास देणे, सर्वसामान्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देणे आणि कामाच्या बाबतीत सातत्य ठेवणे, या गुणांमुळे ते जनमानसात आपले स्थान निर्माण करू शकले आहेत. बीड नगर परिषदेची निवडणूकही त्यांच्या नेतृत्वाखाली लढवताना आम्हाला त्यांच्या मार्गदर्शनाचा आणि संघटन कौशल्याचा मोठा आधार मिळाला. या निवडणुकीत मिळालेले भरघोस यश हे त्यांच्या नेतृत्वावर जनतेने दाखवलेल्या विश्वासाचे प्रतीक आहे.स्वर्गीय अजितदादा पवार यांचे अत्यंत विश्वासू सहकारी म्हणून विजय सिंह यांची ओळख राहिली आहे. अजितदादांच्या कार्यशैलीतील स्पष्टवक्तेपणा, विकासाची दूरदृष्टी, निर्णय घेण्याची क्षमता आणि लोकांसाठी काम करण्याची तळमळ यांचा प्रभाव त्यांच्या कामातून जाणवतो. आज उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्याच्या विकासाची जबाबदारी ते अत्यंत समर्थपणे सांभाळत आहेत. जिल्ह्याच्या प्रश्नांची जाण आणि विकासकामांचा अनुभव यामुळे त्यांच्या नेतृत्वाकडून बीड जिल्ह्याला मोठ्या अपेक्षा आहेत.आज वाढदिवसाच्या निमित्ताने माझ्या या मित्राकडे, सहकाऱ्याकडे आणि जनतेच्या नेतृत्वाकडे पाहताना मनापासून अभिमान वाटतो. बालपणापासून पाहिलेली त्यांची धडाडी आज एका मोठ्या लोकनेतृत्वात परिवर्तित होताना दिसत आहे. त्यांच्यातील कार्यक्षमता, जनतेशी असलेली बांधिलकी आणि विकासासाठीची तळमळ पाहता, त्यांना मंत्रिपदाची जबाबदारी मिळावी, ही केवळ आमची इच्छा नाही, तर बीड जिल्ह्यातील अनेकांच्या मनातील भावना आहे. पक्षश्रेष्ठींनी त्यांच्या अनुभवाचा आणि जनतेशी असलेल्या नात्याचा विचार करून त्यांना नामदार करावे, ही आमची अपेक्षा आहे.मित्र म्हणून त्यांच्या दीर्घायुष्याची, उत्तम आरोग्याची आणि राजकीय वाटचालीतील उत्तरोत्तर यशाची मनःपूर्वक कामना करतो. त्यांच्या नेतृत्वाला आणखी मोठी संधी मिळो, त्यांच्या हातून बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास घडो आणि जनतेच्या मनातील राजे, आता नामदार व्हावेत ही इच्छा पूर्ण होवो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा! मैत्रीचा हा प्रवास असाच कायम राहो आणि नेतृत्वाची ही घोडदौड नव्या उंचीवर पोहोचो!शुभेच्छुक : शेख निजाम शेख जैनुद्दीन, सभापती स्वच्छता व आरोग्य समिति बीड नगर परिषद

शेवटचा पानावरून...

लोकांच्या हृदयात स्थान मिळवणारीच खरी लोकनेत्री

प्रोग्राम डायरेक्टर स्नेहा मेहता, श्वेता शालिनी फाउंडेशनच्या संस्थापक श्वेता शालिनी यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

लोकांच्या हृदयात स्थान मिळवणारा खरा लोकनेता

लोकप्रतिनिधी आणि लोकनेता यांच्यातील फरक स्पष्ट करताना मुंडे म्हणाल्या, ''नगरसेवक, आमदार, खासदार किंवा मुख्यमंत्री होणे म्हणजे लोकप्रतिनिधी होणे. मात्र, पदावरून दूर झाल्यानंतरही ज्याला जनता विसरत नाही, ज्याच्याविषयी लोकांच्या मनात आदर आणि प्रेम कायम राहते, तो खरा लोकनेता असतो.''

आपल्याला सुरुवातीपासून राजकारणात येण्याची इच्छा नव्हती. मात्र, कोणत्याही क्षेत्रात काम केले तरी नेतृत्व करायचे, अशी इच्छा होती. शालेय आणि महाविद्यालयीन जीवनापासून नेतृत्वाचे गुण विकसित होत गेले. वडील गोपीनाथ मुंडे यांच्या कार्यातून अनेक गोष्टी शिकायला मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

महिला नेतृत्वासाठी संयम, स्थिरता, साहस आणि सातत्य हे चार गुण अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगतानात्या म्हणाल्या, सार्वजनिक जीवनात काम करताना महिलांना अनेकदा त्यांच्या दिसण्यावरून, कपड्यांवरून आणि वागण्यावरून टीकेला सामोरे जावे लागते. मात्र, अशा टीकेमुळे महिलांनी स्वतःची ओळख बदलण्याची आवश्यकता नाही.

महिला ही फूलही आहे आणि ठिणगीही

राजकारणात प्रवेश केल्यानंतरच्या एका प्रसंगाची आठवण सांगताना त्यांनी वडिलांनी दिलेला सल्ला सांगितला. राजकीय कार्यक्रमाला जाताना केवळ लोकांना दाखवण्यासाठी साडी नेसण्याऐवजी स्वतःला आरामदायी वाटणारे कपडे परिधान करावेत, असे मुंडे साहेबांनी मला सांगितले होते.महिलांनी नेतृत्व करण्यासाठी पुरुषांसारखे वागण्याची किंवा स्वतःचे नैसर्गिक व्यक्तिमत्त्व बदलण्याची गरज नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दिवंगत नेत्या सुषमा स्वराज यांचा उल्लेख करताना मुंडे म्हणाल्या, ''महिला ही फूलही आहे आणि ठिणगीही आहे. राजकारणात येण्यासाठी महिलांनी स्वतःमधील कोमलता किंवा भावनिकता सोडण्याची गरज नाही.''

व्यक्तीच्या गरजा आणि महत्त्वाकांक्षा वाढत गेल्यानंतर अनेकदा तत्त्वांशी तडजोड केली जाते. व्यवस्था बदलण्याच्या उद्देशाने सार्वजनिक जीवनात आलेल्या व्यक्तींनी स्वतःची मूल्ये बदलू नयेत, असे त्यांनी सांगितले.

आपल्या राजकीय प्रवासातील कठीण प्रसंगांची आठवण सांगताना त्या भावुक झाल्या. वडील मुंडे साहेब यांच्या निधनानंतर आयुष्याला मोठे वळण मिळाले. मात्र, निवडणुकीतील पराभवानंतर सात समर्थकांनी आत्महत्या केल्याचा प्रसंग आपल्यासाठी अधिक वेदनादायी ठरल्याचे त्यांनी सांगितले.''माझ्या पराभवामुळे लोकांनी स्वतःचे जीवन संपवावे, इतके प्रेम त्यांनी माझ्यावर केले. त्यामुळे त्यांच्या कल्याणासाठी माझे आयुष्य समर्पित केले पाहिजे, हीच माझी राजकारणातील बांधिलकी आहे,'' अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

राजकीय यश केवळ निवडणुकीतील विजय किंवा मिळालेल्या पदावर मोजले जाऊ नये. लोकांच्या मनात निर्माण झालेला विश्वास हेच नेतृत्वाचे खरे यश असल्याचे त्यांनी सांगितले.

फाईव्ह बी चा दिला मंत्र

या कार्यक्रमात सहभागी झालेल्या ४० महिलांपैकी एका महिलेच्या सामाजिक उपक्रमाला गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या माध्यमातून पाठबळ देण्याची घोषणाही त्यांनी केली. महिला नेतृत्वासाठी त्यांनी बिलीव्ह, बिगिन, बिल्ड, ब्रिज आणि बी हा मंत्र दिला. स्वतःवर विश्वास ठेवणे, कामाला सुरुवात करणे, त्याला संघटित स्वरूप देणे, माणसांमधील दरी दूर करणे आणि सातत्याने कार्यरत राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.''प्रत्येक गरिबाच्या घरात समृद्धीचा दिवा लावणे शक्य नसले, तरी त्यांच्या मनात आशेचा आणि विश्वासाचा दिवा प्रज्वलित करणे हे खऱ्या लोकनेत्याचे काम आहे,'' असे सांगत त्यांनी उपस्थित महिलांना नेतृत्वाची जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन केले.

महिलांनी स्वतःचा आदर करावा, स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवावा आणि संघर्षातूनही आपली ओळख निर्माण करावी, असा संदेश पंकजाताई मुंडे यांनी दिला.

खपवून घेतला जाणार नाही-सुंदर गित्ते

नंदागौळ,पुस,जवळगाव,बर्दापूर मार्गे पळसी,रेणापुर,ते लातुर अशी सुरू आहे,लातुर हे शैक्षणिक दृष्ट्या व व्यापार,वैद्यकीय दृष्ट्या महत्वाचे ठिकाण असल्याने या मार्गावरून प्रवास करताना अंतर कमी आहे त्यामुळे वेळ व तिकिटाचे पैसे सुद्धा इत्तर मार्गापेक्षा कमी लागतात त्यामुळे विद्यार्थी, तरुण,महिला,जेष्ठ नागरिक,इत्यादीं मोठ्या प्रमाणात प्रवास करत आहेत,त्यामुळे या बसच्या फेरीला चांगले उत्पन्न सुद्धा मिळत असताना मागील १ महिन्यापासून हि बस बंद आहे,त्यामुळे या मार्गावरून या बसने प्रवास करणारे लातूरला जाणारे विद्यार्थी,प्रवाशी,महिला तसेच रुग्णांनी सरपंच सुंदर गित्ते यांच्याकडे तक्रार केली या तक्रारीची दखल घेऊन त्यांनी आज २२ सप्टेंबर रोजी परळी आगारात जाऊन आगार प्रमुख सोनवणे यांची भेट घेऊन,प्रवाशांची मागणी व उत्पन्न असताना सुद्धा लातुरला जाणारी बस कुणाच्या सांगण्यावरून बंद केली ? त्या आदेशाची प्रत मागितली असता आगार प्रमुखांकडे त्या आदेशाची प्रत नव्हती,त्यामुळे परळी आगार प्रमुखांनी बस कशी बंद केली ? जो पर्यंत बस सुरु होत नाही तो पर्यंत आगार प्रमुखाचे कार्यालय न सोडण्याचा निर्णय घेतला व जाब विचारला यावेळी आगार प्रमुख श्री सोनवणे यांनी लेखी पत्र देऊन नंदागौळ मार्गे परळी लातूर हि बससेवा सुरु तात्काळ सुरु करण्या संदर्भातील पत्र दिले,यावेळी परळी आगारात अनेक विषयात मनमानी कारभार सुरु असून परळी आगारातील मनमानी कारभार खपवून घेणार नसल्याचा इशारा सरपंच सुंदर गित्ते यांनी दिला,यावेळी वाहतूक निरीक्षक बळीराम दराडे,गोपाळ दौंड,तसेचसिद्धेश्वर मुंडे,तुकाराम गित्ते,गोविंद गित्ते,गोविंद राख,शामसुंदर गित्ते आदि उपस्थित होते.

शेतकऱ्यांना पैसे द्या-विलास ताटे

पदरात टाकणार हा प्रश्न शेतकऱ्यांसमोर पडला आहे तेव्हा भरतराव गोगावले व महाराष्ट्र शासन यांनी शेतकऱ्यांचे हित लक्षात घेवून पुर्वीची रक्कम अगोदर द्यावी पंचायत समितीकडे मागणी केल्यास बजट नाही हा एकमेव प्रश्न प्रश्नोत्तराच्या वेळी दिला जातो. तेव्हा ६७२८ कोटी रूपये पुर्वीच्या शेतकऱ्यांना देवून मग उरले तरच पुढील कार्यवाही करावी अशी मागणी अनेक शेतकरी करत आहेत.

अधिवेशनात आवाज उठविणार-आ.सोळंके

प्रशासकीय समित्यांमध्ये स्थान मिळाले नसल्याची बाबही निदर्शनास आणून देण्यात आली. तंटामुक्त समिती व स्वस्त धान्य दुकान समितीसह अन्य समित्या कार्यान्वित करण्यासाठी प्रशासनाला सूचना देण्यात येतील, असे आश्वासन आमदार सोळंके यांनी दिले.राज्याध्यक्ष बाळासाहेब शिंदे पाटील, जिल्हाध्यक्ष सुधाकर गाडे पाटील व जिल्हा कार्याध्यक्ष कृष्णा कदम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हे निवेदन देण्यात आले. यावेळी माजलगाव, धारूर व वडवणी तालुक्यांतील अध्यक्ष, पदाधिकारी आणि पोलीस पाटील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजलगाव ग्रामीण पोलीस ॲक्शन मोडमध्ये

जप्त करण्यात आला. याप्रकरणी महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

धारूरमध्ये प्रथमच प्राणिक हीलिंग परिचय सत्राला

प्रमाणित प्रशिक्षक व प्राणिक हीलर सौ. संतोष मिश्रा आणि श्री. संजय मिश्रा यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मानवी ऊर्जा शरीर, आभामंडल (ऑरा), चक्रे, प्राणऊर्जा, ऊर्जा संतुलन आणि ध्यानधारणेचे महत्त्व याविषयी माहिती देण्यात आली. तसेच प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून या पद्धतीची ओळख करून देण्यात आली.

या सत्रात शहरातील विविध क्षेत्रांतील नागरिकांसह २४ महिलांनी सहभाग नोंदविला. सत्रानंतर अनेक सहभागी नागरिकांनी प्राणिक हीलिंगचे पुढील प्रशिक्षण घेण्याची इच्छा व्यक्त केली.

विशेष म्हणजे, प्रा. नितेंद्र शुक्ला व सौ. किरण शुक्ला यांनी सभागृह उपलब्ध करून देण्यासह संपूर्ण कार्यक्रमाचा खर्च स्वतः उचलून सामाजिक बांधिलकी जपली. प्राणिक हीलिंग ही वैद्यकीय उपचारांना पर्याय नसून पूरक पद्धती असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले. धारूरमध्ये आरोग्य, सकारात्मकता आणि आत्मकल्याणाविषयी जागरूकता निर्माण करणारा हा उपक्रम ठरल्याचे प्रा. नितेंद्र शुक्ला यांनी सांगितले.

राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष संभाजीराव आबा शेजुळ यांना

यांच्यासह इतर मान्यवरांनी आबासाहेबांची भेट घेऊन त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. त्यांच्या पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.

डॉ.ए.पी.जे.अकॅडमीचा उपक्रम;

संचालक डॉ. रामेश्वर बांगड आणि प्रा. कैलास घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. परिसरातील सहावी व नववीच्या विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन अकॅडमीच्या वतीने करण्यात आले आहे.

सराव परीक्षेसाठी नावनोंदणी आवश्यक असून अधिक माहितीसाठी ९०२८६९४५५५ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत लक्ष्मी जनार्धन मुंडे यांच्या अमृतदिनानिमित्त

मा. संजयभाऊ दोंड , जिल्हा परिषद बीडचे गटनेते मा. अजय मुंडे तसेच ह.भ.प. श्री. डॉ. तुकाराम महाराज मुंडे (शास्त्री) उपस्थित राहणार आहेत.

प्रमुख उपस्थितीत संत-महंतांचा आशीर्वाद

कार्यक्रमाला ह.भ.प. श्री. गुरुवर्य गोपाळ महाराज वासकर (आण्णा), ह.भ.प. श्री. जगदीश महाराज सोनवणे आणि ह.भ.प. श्री. गणेशनंद महाराज गुट्टे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या महोत्सवाला बाजीराव भैय्या धर्माधिकारी, अरविंद लाटकर, माणिकभाऊ फड, अंड. गोविंद फड, मा. श्री. लक्ष्मण मुंडे, मा. श्री. डॉ. दत्ता केंद्रे, मा. श्री. सूर्यभान (नाना) मुंडे, मा. श्री. मल्हार शिवकर, मा. श्री. राजेशजी गिते, मा. श्री. बालाजी (पिंटू) मुंडे, मा. श्री. निळकंठभाऊ चाटे, मा. श्री. डॉ. नामदेव आघाव, मा. श्री. मधुकरजी आघाव, मा. श्री. रवि कांदे, मा. श्री. राजेशजी देशमुख, मा. श्री. पवन मुंडे सर, मा. डॉ. श्री. राजाराम मुंडे आणि मा. श्री. अमर गिते यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

मा. श्री. प्रदीपजी खाडे, मा. प्रा. विनोद जगतकर, मा. श्री. शंकर कापसे, मा. श्री. प्रा. अरुण पवार, मा. श्री. गोवर्धन कांदे, मा. श्री. सचिनजी कागदे, मा. श्री. संजय मुंडे सर, *मा. श्री. बालासाहेब फड संपादक, दैनिक द. सोमेश्वर साथी मा. श्री. गणेश गायकवाड, मा. श्री. कांताभाऊ फड, मा. श्री. श्रीहरी मुंडे, श्री. गणेश दशरथआबा मुंडे, मा. श्री. सय्यद सिराज, मा. श्री. चांद सर आणि मा. श्री. नवनाथ गिते यांचा समावेश आहे.डॉ. संतोष मुंडे यांना 'माय पुरस्कार'

अमृतदिनानिमित्त सामाजिक कार्याची दखल घेऊन दिला जाणारा 'माय पुरस्कार' मा. श्री. डॉ. संतोष मुंडे, उपाध्यक्ष, दिव्यांग कल्याण मंत्रालय, महाराष्ट्र राज्य यांना प्रदान करण्यात येणार आहे. यावेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचा गौरव तसेच बक्षीस वितरण सोहळाही पार पडणार आहे. आयोजक डॉ. भरत मुंडे. यांच्या पुढाकारातून आयोजन

या भव्य महोत्सवाचे आयोजक श्री. डॉ. भरत जनार्धन मुंडे (एम.एस. सर्जन, विवेकानंद हॉस्पिटल, परळी वैजनाथ तथा अध्यक्ष, विवेकानंद सामाजिक सेवा प्रतिष्ठान, टोकवाडी) मा.संभाजी जनार्दन मुंडे (योग प्रशिक्षक). व्यवस्थापक म्हणून श्री. संतोष नाथराव मुंडे (जय हिंद प्रतिष्ठान) यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

वार सोमवार दिनांक २३ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११:३० ते १:३० यावेळी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार ह भ प रामायणाचार्य /भागवताचार्य सोपान महाराज शास्त्री हिंगोली यांचे कीर्तन संपन्न होणार आहे तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या कीर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा.कार्यवाहक म्हणून श्री. अर्जुन मुंडे, श्री. संदीपान मुंडे, श्री. नितीन मुंडे, श्री. तुकाराम मुंडे, श्री. माऊली मुंडे सर, श्री. मिनानाथ मुंडे, श्री. बालाजी आघाव आणि श्री. श्रीराम मुंडे परिश्रम घेत आहेत.

या महोत्सवाच्या आयोजनात टोकवाडी गावातील श्री. मारोती मुंडे, श्री. सचिन लक्ष्मण मुंडे, श्री. महिपती मुंडे, श्री. गोकुळ चौधुले, श्री. डॉ. संदीपान काळे, श्री. माणिक मुंडे, श्री. सोमनाथ दत्तुराव मुंडे, श्री. राजेभाऊ पारथे, श्री. नागनाथ जिवराज मुंडे, श्री. पिंटू गिरी, श्री. पप्पू मुंडे, श्री. वैजनाथ आघाव, श्री. अमर रोडे, श्री. दिलीप भालेराव, श्री. सुनील मुंडे, श्री. तुकाराम मुंडे (टि.डी.), श्री. सतीश किलचे, श्री. प्रदीप रोडे, श्री. नामदेव मुंडे, श्री. आदिनाथ आघाव, श्री. प्रा. शरद रोडे, श्री. नागनाथ काळे, श्री. मनमथ भांगे, श्री. आजम शेख, श्री. अनंत मनोहर मुंडे, श्री. माऊली (पप्पू) मुंडे, श्री. बाळू मुंडे (माजी सैनिक), श्री. नवनाथ मुंडे, श्री. वाल्मिक मुंडे, श्री. सखाहरी दोंड सर, श्री. अंगद काळे, श्री. आश्रुबा काळे, श्री. राजेभाऊ काळे, श्री. आश्रुबा ज्ञानोबा मुंडे, श्री. बंडू काळे, श्री. संजय श्रीराम मुंडे, श्री. लहुदास मुंडे, श्री. साहेबराव रोडे, श्री. भानुदास मुंडे, श्री. पंडित रोडे, श्री. तुकाराम काळे आणि श्री. सुनील निवृत्ती मुंडे यांचा सहभाग आहे.

जाहीर प्रगटन

परळी शहर व तालुक्यातील आणि सिरसाळा येथील तमाम जनतेस या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार नामे १. मोहम्मद हारुण सय्यद रा. हमालवाडी, परळी वै. जि. बीड. २. आरेफ पिता रईस कुरेशी रा. कुरेशी नगर, परळी वै. जि. बीड यांनी आमच्या ऑफिसवर येऊन माहिती, सुचना व कागदपत्र दिल्यावरुन तसेच अधिकार दिल्यावरुन सदर जाहिर प्रगटन देण्यात येते की, मिर्झा सलमान महेफुज बेग रा. सिरसाळा ता. परळी वै. जि. बीड यांना त्यांचे नांवावरील जमीन विक्री करावयाची असल्याने आमचे पक्षकाराची त्यांच्या सोबत ओहख झाली व त्यांनी त्यांचे नांवावरील मौजे सिरसाळा येथील जमीन गट क्र. ६८ मधील एकुण क्षेत्र ०७ हेक्टर ८२ आर जमीनीपैकी क्षेत्र ०२ हेक्टर ०० आर जमीन जिची चतुर्सिम पुर्वेस -नोमाण महेफुज बेग, पश्चिमेस - देशमुख यांची जमीन, दक्षिणेस पोहनेर रस्ता व २० फुट रुंदीचा रस्ता व उत्तरेस-बालाजी कैलास ढेंबरे यांची जमीन., वरील चतुसिमेच्या आतील संपुर्

page 2_Layout 1 11/22/2026 12:29 AM Page 2

महाराष्ट्रातील निर्भिड साप्ताहिक रविवार

जगमित्र

नांदेड रविवार, दि.२२ नोव्हेंबर २०२६ पान ०३

आराध्यदैवताच्या स्मारकासमोरील रस्त्यावरील खड्ड्यामुळे नागरिकांचे जीव धोक्यात

देगलूरअजीम अन्सारी

देगलूर:- शहराची अस्मिता आणि प्रमुख आकर्षण असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासमोर देगलूर-बिदर राष्ट्रीय राज्य महामार्गावर जीवघेणे खड्डे पडले आहेत. नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करत आणि सार्वजनिक सुरक्षिततेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित



प्रशासकीय विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत.महाराष्ट्र महामार्ग अधिनियम १९५५ अंतर्गत राज्यमार्ग आणि प्रमुख जिल्हा मार्गाचे बांधकाम देखभाल व दुरुस्ती करण्याची कायदेशीर जबाबदारी या कायद्यान्वये सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सोपवलेली आहे. मात्र संबंधित विभागाचे सर्रासपणे दुर्लक्ष दिसून येत आहे. याशिवाय भारतीय राज्यघटनेचे कलम २१ नुसार नागरिकांना जीवीत व व्यक्तिगत स्वातंत्र्याचा अधिकार दिला आहे. धत विभाग तयार होताना दिसत नाही. शिवाय एखादी घटना घडल्याशिवाय प्रशासन जागी सुद्धा होत नाही हा इतिहासच आहे. आणि हा इतिहास पुन्हा घडावा आणि आपण त्यावर काम करावं, अशी जर प्रशासनाची इच्छा असेल

ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दतील वसरणी येथील शेतात जन्ना मन्ना जुगार अड्ड्यावर छापा १६ आरोपीसह दहा लाखांचा मुद्देमाल जप्त..

नांदेड/शेख मौला

नांदेड - ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दतील वसरणी येथील शेतात चालणाऱ्या जन्ना-मन्ना जुगार अड्ड्यावर छापा टाकून १६ आरोपींसह १०लाख १७ हजारांचा मुद्देमाल जप्त केला असून या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.नांदेड जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध डॉ.नीलाभ रोहन, पोलीस अधीक्षक, नांदेड यांच्या आदेशानुसार सुरू असलेल्या विशेष मोहिमे अंतर्गत पोलीस ठाणे नांदेड ग्रामीण हद्दीत गुन्हे शोध पथकाने कौठा-वसरणी शिवारातील एका शेतात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर मोठा छापा टाकुन कारवाईत १६ आरोपींकडून रोख रक्कम, मोबाईल फोन, एक चारचाकी वाहन आणि दोन दुचाकी असा एकूण १०,लाख १७,हजार ४८०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.दिनांक २० नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री पोलीस ठाणे नांदेड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक यांनी हद्दीतील अवैध धंद्यांची माहिती काढून कारवाई करण्याचे आदेश गुन्हे शोध पथकाला दिले होते. त्यानुसार सदरचे गुन्हे शोध पथक खाजगी वाहनाने हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना मध्यरात्रीच्या सुमारास पथकाला गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, कौठा-वसरणी येथील शेत गट क्रमांक २-६ मध्ये प्रदीप उर्फ सोहम रोहत्रे हा आपल्या शेतातील मोकळ्या जागेत काही इसमांसह पत्त्यांवर पैसे लावून जन्ना-मन्ना नावाचा जुगार खेळत आणि



खेळवित आहे.सदर माहितीच्या आधारे पथकाने दोन पंचांच्या समक्ष घटनास्थळी छापा टाकला. यावेळी १६ इसम नामे-१. प्रदीप उर्फ सोहम लालचंद रोहत्रे (वय ३८, रा. शनी मंदिराजवळ, जुना मोंढा, नांदेड) २. शेख मोहसिन शेख बाबु (वय ३२. रा. वाजेगाव, ता. जि. नांदेड) ३. सौरभ साहेबराव चौदंते (वय २५, रा. तान्हाजीनगर, नांदेड) ४. शुभम राजेंद्रसिंह चव्हाण (वय २६, रा. गाडीपुरा, नांदेड) ५. अब्दुल सलाम अब्दुल समर (वय ३५, रा. उमर कॉलनी, देगलूर नाका, नांदेड) ६. कृष्णा रावसाहेब कदम (वय ३५, रा. गोपाळ नगर, सांगवी. नांदेड) ७. सिद्धांत सागर यादव (वय ३०,रा. वजिराबाद,नांदेड)८. प्रविण जुगलकिशोर धुत (वय ३७. रा. सराफा, जुना मोंढा, नांदेड) ९.अभिजीत अर्जुन औसेकर (वय २८, रा. जुना मोंढा, नांदेड) १०. फिरोज खान वाहिद खान पठाण (वय ३८, रा.बालाजी नगर, हिंगोली नाका, नांदेड) ११. सुनिल प्रतापसिंह लाला (वय ३०, रा. माळटेकडी. नांदेड) १२. सरताज-सिंग अजीतसिंग (वय ३३. रा.अबचलनगर, नांदेड) १३. सय्यद हुसेन सय्यद युसुफ (वय ३०. रा.वाजेगाव, नांदेड) १४. राजेश रामराव हांबर्डे (वय ३९. रा. विष्णुपुरी, नांदेड) १५. नारायण बळीराम चिटलेवार (वय ५२, रा. एमआयडीसी बळीरामपूर, नांदेड) १६. सतपालसिंग जसपालसिंग हांडी (वय ३२, रा.अबचलनगर,नांदेड) हे गोल आकारात बसून बदक छाप पत्त्यांवर पैशांची बाजी लावून जुगार खेळताना रंगेहाथ आढळून आले.पोलिसांनी सर्वांना ताब्यात घेऊन पंचासमक्ष अंगझडती व घटनास्थळावरुन १) एक फोर्ड कंपनीची फिगो कार (क्र. २० १०७६) किंमत ४,५०,०००/- रुपये. २) दोन दुचाकी वाहने (क्र. २६ ७११८) (क्र. २६ ३३३९) - किंमत २,१०,०००/- रुपये. ३) विविध कंपनीचे ११ मोबाईल फोन एकूण किंमत ३,३५,०००/- /- रुपये. ४) रोख रक्कम व इतर साहित्य २२४८०/-रुपये आणि जुगार खेळण्याचे बदक छाप असा एकुण १०,१७,४८०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.या प्रकरणी वरील नमुद आरोपीविरुध्द पोलीस ठाणे नांदेड ग्रामीण येथे गुन्हा १४८५/२०२६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम, अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.सदरची कारवाई डॉ.नीलाभ रोहन,पोलीस अधीक्षक, नांदेड यांच्या आदेशाने मा. संदीप जाधव,अपर पोलीस अधीक्षक,श्रीमती अर्चना पाटील,अपर पोलीस अधीक्षक,प्रशांत शिंदे, उपविभागीय पोलीस अधीकारी,इतवारा तसेच पोलीस ठाणे नांदेड ग्रामिणचे पोलीस निरीक्षक अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे सहायक पोलिस निरीक्षक कपिल पाटील व त्यांच्या पथकातील पोलीस अंमलदार विष्णू खिल्लारे,कमलाकर सदावर्ते, समीर अहमद, बालाजी यादगीरवाड,आसीफ शेख, टिप्परसे,कांबळे, माळगे,हानमंत तेलंग आणि संतोष पवार यांनी पार पाडली आहे.अवैध जुगार, मटका तसेच इतर बेकायदेशीर प्रकारां विरुद्ध पोलिसांकडून सातत्याने कारवाई करण्यात येत आहे.

भोसी परिसरात मोटरसायकलचा भीषण अपघात

तालुका आरोग्य अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे ग्रामीण आरोग्य सेवा ठप्प;

भोकर तालुक्यातील भोसी येथील उमा पेट्रोल पंपाजवळ सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास मोटरसायकलचा (क्र. ०४ १६८६) भीषण अपघात झाला. या अपघातात संतोष आंबीकर हा व्यक्ती भोकर हून किवळा नांदेड कडे जात असतांना एच पी पेट्रोल पंपजवळ मोटरसायकल स्वतःहून स्लिप होऊन गंभीर जखमी होऊन रक्ताच्या थारोळ्यात पडला होता अपघाताची माहिती मिळताच कपिल कल्याणकर, स्वप्नील मोरे व गंगाधर गायकवाड यांनी क्षणाचाही विलंब न लावता घटनास्थळी धाव घेतली. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या त्या अज्ञात जखमीची प्रकृती अत्यंत चिंताजनक होती. कार्यकर्त्यांनी तात्काळ भोसी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या रुग्णवाहिका चालकाला संपर्क साधला. मात्र, वारंवार फोन करूनही स्थानिक रुग्णवाहिका चालक घटनास्थळी पोहोचला नाही. १०८ ची रूग्ण वाहिका पण वेळेवर आली नाही



महामार्ग पोलीसांना कळविल्यानंतर ताबडतोब बारड महामार्ग येथील पोलीस कर्मचारी सतिश गुरूतवाड, विशाल जाधव,सुशील डुबळे,यांनी शासकीय ॲम्बुलन्स २६ ८५२७ ने बारड येथील सरकारी दवाखान्यात उपचारासाठी शरीक केले प्रसंगावधान आणि तत्परता दाखवत जखमीला तातडीने मदत करत रुग्णालयात वेळेवर दाखल केल्याने ते व तरुण महामार्ग पोलीस देवदूता सारखे धावून आल्याने त्या अपघातग्रस्तांचे जीव वाचले अशी चर्चा सर्वत्र होत आहे. या घटनेमुळे तालुक्यातील आरोग्य यंत्रणेची लक्तरे पुन्हा एकदा वेशीवर टांगली गेली असून, यामुळे ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था अक्षरशः व्हेंटिलेटरवर गेली आहे. तालुका आरोग्य अधिकारी कुंभकर्णी झोपेत असल्याने गरीब आणि सर्वसामान्य रुग्णांना नाहक त्रास सहन करावा लागत असून, खाजगी रुग्णालयांची पायरी चढण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे.

महिला सुरक्षेबाबत नांदेड पोलीसांची कठोर भूमिका:

छेडछाड करून जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या आरोपीविरुद्ध अवघ्या ७२ तासांत दोषारोपपत्र दाखल.

उस्माननगर / प्रतिनिधी उस्माननगर पोलीस ठाणे यांची कारवाईपोलीस स्टेशन उस्माननगर हद्दीत एका अल्पवयीन शाळकरी मुलीचा पाठलाग करून छेडछाड करणाऱ्या आणि लग्नास नकार दिल्यास जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या आरोपीविरुद्ध उस्माननगर पोलिसांनी कठोर आणि वेगवान कारवाई केली आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर तपासाची चक्रे वेगाने फिरवत पोलिसांनी अवघ्या ७२ तासांच्या आत तपासाची सर्व कार्यवाही पूर्ण करून मा. अतिरिक्त सत्र न्यायालय, कंधार येथे दोषारोपपत्र (चार्जशीट) दाखल केले आहे.दि. १८/११/२०२६ रोजी पोलीस स्टेशन उस्माननगर येथे फिर्यादीने तक्रारी दिली की, आरोपी साईनाथ विठ्ठल नाईनवड (व्यवसायः चालक, रा. उस्माननगर, ता. कंधार, जि. नांदेड) हा पीडित मुलीला सार्वजनिक रस्त्यावर व गल्लीत येऊन तिला हातवारे करून बोल देत होता. पीडितेने लग्नास नकार दिल्यास तिला जिवंत ठेवणार नाही, अशी जीवे मारण्याची धमकीही आरोपीने दिली होती. पीडितेच्या तक्रारीआला.गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तात्काळ तपासाची सूत्रे हलवली आणि दि. १९/११/२०२६ रोजी आरोपी साईनाथ विठ्ठल नाईनवड यास अटक केली. तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक / सुनील सूर्यवंशी यांनी तात्काळ सर्व तांत्रिक व साक्षीदारांचे पुरावे गोळा करून तपास पूर्ण केला. त्यानुसार दोषारोप क्रमांक १०५/२०२६, दि. २०/११/२०२६ अन्वये मा. अतिरिक्त सत्र न्यायालय, कंधार येथे दोषारोपपत्र (स्पेशल कोर्ट केस नंबर ४८/२०२६) अन्वये दाखल करण्यात आले आहे.

खा.डॉ.अजित गोपछडे अन्दोलनकर्ते शेतकऱ्यांना दिलेले शब्द पाळले,महसुलमंत्र्याची घेतली भेट.

तालूका प्रतिनिधी(मोहम्मद अफजल)

बाभळी बंधाऱ्याच्या बॅकवॉटर मुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आंदोलनस्थळी दिलेल्या आश्वासनानुसार, राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी शासनस्तरावर लेखी पाठपुरावा सुरू केला आहे. त्यांनी शेतकऱ्यांच्या मागण्यांसंदर्भात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन दिले.त्याची तात्काळ दखल घेत महसूल मंत्र्यांनी पुढील उचित कार्यवाहीसाठी हे प्रकरण जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पाठवले आहे. त्यामुळे बाधित शेतकऱ्यांच्या प्रश्नाला आता गती मिळण्याची चिन्हे आहेत.चिरली-दिग्रस येथील गोदावरी नदीपात्रात बाभळी बंधारा व पोचम पाड बॅकवॉटरमुळे बाधित शेतकऱ्यांनी तीन दिवस बेमुदत धरणे आंदोलन केले होते. यावेळी आंदोलनस्थळी भेट देत खा.डॉ.गोपछडे यांनी शासनस्तरावर पाठपुरावा करण्यासह आगामी हिवाळी अधिवेशनात संसदेत हा प्रश्न उपस्थित करण्याचे आश्वासन



दिले होते.त्यानुसार खा.डॉ. गोपछडे यांनी १५ नोव्हेंबर २०२६ रोजी महसूल मंत्री बावनकुळे यांना पत्र पाठवून नांदेड जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती,पाणीटंचाई, बाभळी बंधारा व बळेगाव बॅरेजम धील पाण्याचे नियोजन तसेच बॅकवॉटर बाधितांना कायमस्वरूपी नुकसानभरपाई देण्याकडे लक्ष वेधले. या निवेदनाची दखल घेत महसूल मंत्री बावनकुळे यांनी १७ नोव्हेंबर रोजी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना पत्र पाठवून उचित कार्यवाहीची विनंती केली आहे. या पत्राची प्रत नांदेड जिल्हाधिकाऱ्यांनाही पाठवण्यात आली आहे.खा.डॉ.गोपछडे यांनी यापूर्वीही बाभळी बंधारा बाधितांचा प्रश्न संसदेत मांडला होता. आगामी हिवाळी अधिवेशनातही हा विषय प्रभावीपणे उपस्थित करून शासनाच्या कार्यवाहीचा जाब विचारणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. आंदोलनस्थळी दिलेला शब्द पाळत त्यांनी हा पाठपुरावा सुरू केल्याने, या पत्रव्यवहाराचे रूपांतर आता प्रत्यक्ष निर्णयात होऊन पाच तालुक्यांतील बाधित शेतकऱ्यांना न्याय मिळणार का?याकडे सर्व शेतक-यांचे लक्ष लागले आहे.

कुंडलवाडीत अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञ

प्रतिनिधी/मोहम्मद अफजल

विठ्ठलनामाचा अखंड गजर, टाळ-मृदंग विण्याचा मधुर निनाद आणि भक्तीभावाने भारावलेले वातावरण अशा अत्यंत मंगलमय वातावरणात आज (दि.२१ नोव्हेंबर) कुंडलवाडीतील वंजारगल्ली येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याची दीपपूजनाने भक्तिमय सुरुवात झाली. समस्त वंजारी समाज बांधवांच्या वतीने सलग दुसऱ्या वर्षी या आध्यात्मिक पर्वाचे भव्य आयोजन करण्यात आले असून, २१ ते २८ नोव्हेंबरदरम्यान संपूर्ण शहर हरीभक्तीच्या रंगात न्हाऊन निघणार आहे. आज समस्त वंजारी समाज बांधवांच्या हस्ते विधिवत दीपपूजन व ग्रंथपूजन करून या ज्ञानयज्ञाचा शुभारंभ करण्यात आला. पहिल्याच दिवशी परिसरातील भाविकांनी दर्शनासाठी आणि कथेचा लाभ घेण्यासाठी मोठी गर्दी केली होती. ज्ञान, भक्ती आणि नामस्मरणाची पर्वणी यावेळी पाहवयास मिळाली. ह.भ.प. गुरुवर्य कागदे बापू महाराज यांच्या कृपाशीर्वादाने व मार्गदर्शनाखाली या सप्ताहाचे नियोजन करण्यात आले आहे. संसाराच्या धावपळीतून मनाला शांती आणि आध्यात्मिक समाधान देणारा हा सोहळा भाविकांसाठी पर्वणीच ठरणार आहे. सप्ताहादरम्यान दररोज खालीलप्रमाणे धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे.पहाटे ४ ते ६ काकडा भजन सकाळी ६.३० ते ९ ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पारायण सकाळी १० ते दुपारी १२ गाथा भजन दुपारी २ ते ५ श्रीमद्भागवत कथा (भागवताचार्य ह.भ.प.कान्होपात्राताई कस्तुरे -



कुंडलवाडीकर यांच्या अमृतवाणीतून)सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ रात्री ८.३० ते ११ हरिकीर्तन व हरिजागर दिग्गज कीर्तनकारांची मांदियाळी या आठवडाभरात राज्यातील नामवंत कीर्तनकारांच्या वाणीतून भक्तीरसाचा वर्षाव होणार आहे. यामध्ये २१ नोव्हेंबर रोजी ह.भ.प. प्रमोद महाराज जाधव चोंडीकर,२२ नोव्हेंबर रोजी भागवताचार्य कान्होपात्राताई कुंडलवाडीकर, २३ नोव्हेंबर रोजी ह.भ.प. मैनाताई हिंपालनारीकर, २४ नोव्हेंबर रोजी प.पू. शंभू महाराज गोरे (वंजारी दिग्रसकर)२५ नोव्हेंबर रोजी ह.भ.प. परमेश्वर महाराज शहापूरकर, २६ नोव्हेंबर रोजी प.पू. योगेश महाराज अग्रवाल (वसमतकर) आणि २७ नोव्हेंबर रोजी प.पू.महंत संतोषपुरी महाराज चोळाखेकर यांची सुश्राव्य कीर्तने होणार आहेत.

२८ नोव्हेंबरला काल्याचे कीर्तन व महाप्रसाद शनिवारी, २८ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेत प.पू. राम महाराज पांगरेकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने या भक्तीसोहळ्याची सांगता होणार असून,त्यानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या भक्तीसोहळ्याचे उत्तम नियोजन करण्यासाठी शंकर हमंद,मोहन गंगोने, रमेश करपे, (गुरुजी) विठ्ठल हेमके,भीम पोतनकर, मारुती करपे, नरेश साठे, राम भास्कर,विजय धात्रक,इंद्रकरण भोरे, संजय भास्कर,संजय हमंद,रुक्माजी करपे, लक्ष्मण गंगोने,संतोष खांडरे,गंगाप्रसाद कानकाटे, इरेश दुप्तले,राजकिरण हमंद,संजय दुप्तले, जगदीश हमंद,साई माहेवार, सय्याराम नवाथे, पोतन्ना करपे,गंगाप्रसाद नवाथे,राम भोरे,दत्तू भोरे, राजू हमंद,कैलास माहेवार, राजेश दुप्तले, राजू माहेवार, साईनाथ भोरे, सदानंद हमंद, शिवा करपे, लक्ष्मण गंगोने,प्रकाश भोरे,दत्ता वारेवार, संदीप धात्रक,परशुराम गंगोने,राजू भोरे,सय्याराम दुप्तले,प्रमोद साठे, अंकुश माहेवार,रुपेश साठे, दत्ता हमंद व समस्त वंजारी समाज बांधव अहोरात्र परिश्रम घेत आहेत.तरी परिसरातील सर्व भाविक भक्तांनी सहकुटुंब उपस्थित राहून या श्रीमद्□ भागवत पारायण, कथा श्रवण आणि हरिकीर्तनाचा लाभ घेऊन पुण्य संपादन करावे, असे आग्रहाचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

मुदखेड रेल्वे स्थानकावर प्रमुख एक्स्प्रेस गाड्यांना थांबा द्या!

सर्वसामान्य रेल्वे प्रवासी व भाविकांची गैरसोय दूर करण्यासाठी खासदार अशोकराव चव्हाण यांच्याकडे मागणी; ईश्वर पिन्नलवार यांनी मांडल्या प्रवाशांच्या समस्या

मुदखेड तालुका प्रतिनिधी ।

मुदखेड रेल्वे जंक्शन स्थानकावरून प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य रेल्वे प्रवाशांसह भाविकांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी प्रमुख एक्स्प्रेस गाड्यांना पुन्हा थांबा देण्यात यावा, अशी मागणी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्याकडे करण्यात आली आहे. दक्षिण मध्य रेल्वेच्या सल्लागार समितीचे सदस्य ईश्वर पिन्नलवार यांनी खासदार चव्हाण यांची भेट घेऊन यासंदर्भात सविस्तर चर्चा केली व प्रवाशांच्या विविध अडचणी त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. मुदखेड हे नांदेड जिल्ह्यातील महत्त्वाचे रेल्वे जंक्शन असून या स्थानकावरून दररोज मोठ्या संख्येने प्रवासी विविध



शहरांकडे प्रवास करतात. विशेषतः नोकरी, व्यवसाय, शिक्षण, वैद्यकीय उपचार तसेच धार्मिक यात्रांसाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी मुदखेड रेल्वे स्थानक महत्त्वाचे केंद्र आहे. पूर्वी या स्थानकावर अनेक महत्त्वाच्या सुपरफास्ट व एक्स्प्रेस गाड्यांना थांबा उपलब्ध होता. मात्र, रेल्वे प्रशासनाने काही गाड्यांचे थांबे रद्द केल्यामुळे स्थानिक प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.विशेषतः काचीगुडा ते भगत की कोठी ही एक्स्प्रेस मुदखेड मार्गे धावते. या रेल्वे मार्गावरून उज्जैनसह इतर महत्त्वाच्या धार्मिक स्थळांकडे जाणाऱ्या भाविकांची संख्या लक्षात घेता या गाडीला मुदखेड येथे थांबा मिळणे अत्यंत आवश्यक आहे. थांबा नसल्यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले तसेच धार्मिक यात्रेला जाणाऱ्या भाविकांना अन्य स्थानकांवरून प्रवासाचे नियोजन करावे लागत आहे. परिणामी त्यांचा वेळ आणि आर्थिक खर्चही वाढत आहे.मुदखेड हे रेल्वे जंक्शन असतानाही महत्त्वाच्या एक्स्प्रेस गाड्यांना थांबा नसणे ही प्रवाशांसाठी गैरसोयीची बाब आहे. त्यामुळे काचीगुडा-भगत की कोठी एक्स्प्रेससह इतर प्रमुख एक्स्प्रेस गाड्यांना मुदखेड रेल्वे स्थानकावर किमान दोन मिनिटांचा थांबा मंजूर करावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.या मागणीमुळे मुदखेड शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागातील हजारो प्रवाशांना दिलासा मिळू शकतो. तसेच नांदेड जिल्ह्यातील प्रवाशांनाही लांब पल्ल्याच्या रेल्वे प्रवासासाठी अधिक सोयीचा पर्याय उपलब्ध होईल.या प्रश्नावर खासदार अशोकराव चव्हाण यांनी सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे मुदखेड रेल्वे स्थानकावर पुन्हा प्रमुख एक्स्प्रेस गाड्यांचे थांबे सुरू होण्याबाबत प्रवाशांच्या अपेक्षा वाढल्या आहेत.यावेळी भाजपचे जिल्हा प्रवक्ते संतोष पांडागळे उपस्थित होते.

page 2_Layout 1 11/22/2026 12:29 AM Page 1

महाराष्ट्रातील निर्भिड साप्ताहिक रविवार

जगमित्र

परभणी | रविवार, दि.२२ नोव्हेंबर २०२६ | पान ०४

आता संभाजी नगर, पुणे, मुंबई येथे जाण्याची गरज नाही

पुळव्याध : संडासच्या जागी आग होणे, दुखणे, कोंब येणे, रक्त जाणे, जागा लहान होणे, फिशर

सांधेदुखी : पाठीच्या मणक्याचे त्रास, चमक मारणे, गॅप पडणे, गुडघे दुखी, टाचदुखी, मानपाठ, कंबरदुखी, हातपायाला मुंग्या येणे, नस दबणे, डोकेदुखी, अंग दुखणे,

वंदयत्व : मुल बाळ होत नसल्यास, पचनाचे व पित्ताचे त्रास, पोटदुखी, त्वचारोग, ॲलर्जि सर्दी, खोकला, दमा.

रविवारी दवाखाना बंद राहील

वेळ : स. ११ ते २.३० संध्या : ६ ते ८

डॉ.रविंद्र ईटके
आयुर्वेद व पंचकर्म तज्ञ (पुणे)

डॉ.सौ.भाग्यश्री ईटके
स्त्रीरोग व आयुर्वेद तज्ञ

सोनोग्राफी सेंटर समोर पद्मावती गल्ली, परळी. वै.
मो.9822816010, 7588596838

विश्वश्री : आयुर्वेद हॉस्पिटल व पंचकर्म केंद्र

अजितदादांचे ' मी कामाचा माणूस आहे ' हे ब्रीदवाक्य किसान सभेने प्रत्यक्ष कृतीतून जपावे -उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

हिंगोली /गोपाल सातपुते

हिंगोली - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या किसान सभेच्या वतीने कार्यकर्त्यांनी छातीवर लावण्यासाठी तयार करण्यात आलेल्या विशेष बिल्ल्याचे अनावरण पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री ना. सुनेत्रा अजितदादा पवार यांच्या शुभहस्ते मुंबई येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश कार्यालयात उत्साहात संपन्न झाले. यावेळी किसान सभेचे राज्य पदाधिकारी आणि जिल्हाध्यक्ष यांच्या बैठकीत मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार भावूक झाल्या. त्या म्हणाल्या की, स्वर्गीय अजितदादांचे आवडीचे



वाक्य होते, 'मी कामाचा माणूस आहे.' किसान सभेने हेच वाक्य आपले ब्रीदवाक्य मानून शेतकऱ्यांच्या सुख-दुःखात आणि अडीअडचणींच्या काळात सदैव त्यांच्या पाठीशी उभे राहावे. राज्यातील युती सरकार शेतकऱ्यांच्या हितासाठी विविध महत्त्वपूर्ण निर्णय घेत आहे. या निर्णयांची आणि शासनाच्या योजनांची माहिती राज्यातील शेवटच्या घटकातील शेतकऱ्यापर्यंत पोहोचवून त्यांना योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देणे ही किसान सभेची प्रमुख जबाबदारी आहे. हे काम निष्ठेने, तत्परतेने आणि सेवाभावी वृत्तीने केले पाहिजे. तरच स्वर्गीय अजितदादांच्या विचारांना आणि छातीवरील या बिल्ल्याला खऱ्या अर्थाने न्याय दिल्यासारखे होईल, असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमाला राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या अध्यक्षा वैशाली नागवडे, आमदार संजय बनसोडे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस तथा फ्रंटल प्रमुख लतीफभाई तांबोळी, किसान सभेचे प्रदेशाध्यक्ष ॲड. वसंतराव मनकर, राज्य संघटक डॉ. मंगेश देशमुख, राज्य सरचिटणीस डॉ. गणेश डोंगरे, राज्य उपाध्यक्ष तथा विदर्भ विभागप्रमुख जगदीशभाई जूनगरी यांच्यासह राज्यभरातील किसान सभेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रदेश सरचिटणीस लतीफभाई तांबोळी यांनी केले

नव्याने बांधलेल्या पुलांवर खड्ड्यांचे साम्राज्य; अपघातांच्या मालिकेने वाहनधारकांचा जीव धोक्यात!

परभणी/प्रतिनिधी

परभणी शहरातील रस्त्यांची दुरवस्था आणि खड्ड्यांचा प्रश्न गंभीर बनत असतानाच आता नव्याने बांधण्यात आलेल्या पुलांवरही मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनधारकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ वरील वसमत मार्गावरील चिंतामणी महाराज परिसरातील नव्याने उभारण्यात आलेल्या पुलावर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. या खड्ड्यांमुळे दररोज अपघात होत असूनही राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या संबंधित अभियंत्यांचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. चिंतामणी महाराज परिसरातील या पुलावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. विशेषतः दुचाकीस्वारांसाठी हे खड्डे जीवघेणे ठरत आहेत. खड्डे चुकविण्याच्या प्रयत्नात दुचाकी, ऑटोरिक्षा तसेच चारचाकी वाहनांचे अपघात होत आहेत. अचानक समोर येणाऱ्या खड्ड्यांमुळे वाहनचालकांचे नियंत्रण सुटून दुर्घटना घडत आहेत. या अपघातांमध्ये अनेकांना गंभीर दुखापतींना सामोरे जावे लागत असून काहींना कायमचे अपंगत्व येण्याची भीती निर्माण झाली आहे. हात-पाय गमावण्याची वेळ येत असतानाही संबंधित यंत्रणा जागी होणार का, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.विशेष म्हणजे, अशाच प्रकारची परिस्थिती जिंतूर मार्गावरील गोल्डन बेकरीसमोरील पुलावरही निर्माण झाली आहे. महानगरपालिकेच्या वतीने नाल्यावर बांधण्यात आलेल्या या पुलावर मोठा खड्डा पडला आहे. या खड्ड्यातून मार्ग काढताना वाहनधारकांची मोठी कसरत होत असून अनेक वाहनांची चाके खड्ड्यात आदळत आहेत. त्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे.एकीकडे विकासकामांच्या नावाखाली कोट्यवधी रुपये खर्च केले जात असताना दुसरीकडे



नव्याने बांधलेल्या पुलांची अशी अवस्था होणे ही गंभीर बाब आहे. कामांचा दर्जा, देखभाल आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या जबाबदारीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.जिल्हा प्रशासनाने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन चिंतामणी महाराज परिसरातील पुलाची राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत, तर गोल्डन बेकरीसमोरील पुलाची महानगरपालिकेमार्फत दुरुस्ती करावी. तसेच खड्डे बुजवून भविष्यातील अपघात टाळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी वाहनधारक आणि नागरिकांकडून होत आहे.

माणुसकीचा हात पुढे! मनोरुग्ण व्यक्तीला मिळाला सुरक्षित निवारा; सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीने साथ फाउंडेशनमध्ये दाखल!

प्रतिनिधी/नीलम चकोले दिनांक : २१ नोव्हेंबर २०२६ कळमेश्वर पोलीस स्टेशन हद्दीतील कामठीगोंडखैरी महामार्गावर आलेसूर व गोंडखैरी दरम्यान अंदाजे ४५ ते ५० वयोगटातील एक मनोरुग्ण व्यक्ती २० नोव्हेंबर रोजी रात्री आढळून आली होती. सदर व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी कळमेश्वर पोलीस प्रशासन व सामाजिक कार्यकर्त्यांकडून प्रयत्न करण्यात आले.याबाबतची माहिती मिळताच कळमेश्वर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मा. मनोजजी काळबारे माणुसकीचे कार्य आहे. या कार्यातून देव्यांशी फाउंडेशन आणि मंगेश गमे यांनी सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न केला आहे.या संपूर्ण कार्यात कळमेश्वर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मा. मनोजजी काळबांडे यांच्या मार्गदर्शनातून मदतीची प्रक्रिया पार पडली.रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा!माणुसकी जपूया, निराधारांना आधार देऊया! सामाजिक व रुग्णसेवकमंगेश भाऊ गमे



देव्यांशी फाउंडेशन, कळमेश्वर मो. ८३२९०२०९१६

दहेगाव रेल्वे ब्रिजवर दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने ५२ वर्षीय महिला जखमी!



प्रतिनिधी सागर पडोळे दिनांक : २१नोव्हेंबर२०२६वेळ : सायंकाळी७:०० वाजताअपघातस्थळ : कळमेश्वरनागपूर रोड, दहेगाव रेल्वे ब्रिजकळमेश्वर पोलीस स्टेशन हद्दीतील कळमेश्वरनागपूर मार्गावरील दहेगाव रेल्वे ब्रिजवर दुचाकीचा अपघात झाला.या अपघातात सुनंदा बंडोजी निकोसे (वय ५२ वर्षे, रा. मोहपा) या जखमी झाल्या. त्या आपल्या मुलाच्या दुचाकीवरून प्रवास करीत असताना अचानक दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने खाली पडल्या आणि जखमी झाल्या.घटनेची माहिती मिळताच प्रफुल भाऊ चिमूरकर यांनी तत्परता दाखवत अनागरिकांनी केवळ बघ्याची भूमिका न घेता शक्य ती मदत करावी.माणुसकी जपा, अपघातग्रस्तांना मदतीचा हात द्या! देव्यांशी फाउंडेशनसामाजिक व रुग्णसेवक मंगेश गमे
रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा!

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरातील दुर्घटना; अपघातानंतर वाहतुकीची कोंडी

शिवाई बसच्या चाकाखाली चिरडून पादचाऱ्याचा मृत्यू; दुसरा जखमी

परभणी/प्रतिनिधी

परभणी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळा परिसरात राज्य परिवहन महामंडळाच्या शिवाई बसच्या मागील चाकाखाली सापडून एका पादचाऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर अन्य एकजण जखमी झाला. शनिवारी (दि. २१) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास ही घटना घडली. भरवस्तीत आणि वर्दळीच्या चौकात घडलेल्या या दुर्घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. मिळालेल्या माहितीनुसार, दोन पादचारी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरातून रेल्वेस्थानकाच्या दिशेने जात होते. त्याचवेळी राज्य परिवहन महामंडळाची शिवाई बस या परिसरातून वळसा घेऊन रेल्वेस्थानकाकडे निघाली होती. दरम्यान,



चौकातील वळणावर बसच्या चाकाखाली दोन्ही पादचारी सापडले. या भीषण अपघातात एका पादचाऱ्याचा मृत्यू झाला, तर दुसरा जखमी झाला. जखमीला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती आहे.अपघातात मृत्यू झालेला पादचारी परभणी तालुक्यातील धर्मापुरी गावचा रहिवासी असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. मात्र, त्याचे नाव आणि अपघात नेमका कोणत्या कारणामुळे घडला, याबाबत सविस्तर माहिती व्रत लिहिपर्यंत मिळू शकली नाही. दरम्यान, शहरातील अत्यंत वर्दळीच्या चौकात हा अपघात घडल्याने घटनास्थळी नागरिकांनी मोठी गर्दी केली. अपघातानंतर रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. त्यामुळे काही काळ वाहतुकीचा पूर्णपणे खोळंबा झाला. वाहनधारकांना मार्ग काढताना अडचणींचा सामना करावा लागला. भरचौकात घडलेल्या या दुर्घटनेमुळे पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा आणि वर्दळीच्या चौकातील वाहतूक व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

वनामकृवित सर्वाधिक सीजीपीएचा मान प्रिया शिंदे यांचा सुवर्णपदकाने गौरव

परभणी । प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील विद्यार्थिनी कु. प्रिया पंजाबराव शिंदे यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांना कृषिविद्या विषयात पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली असून, विद्यापीठातून सर्वाधिक सीजीपीए प्राप्त केल्याबद्दल प्रतिष्ठेच्या डॉ. जे. टी. नानकर व श्रीमती वत्सला नानकर स्मृती सुवर्णपदकाने गौरविण्यात आले. विद्यापीठाच्या २८ व्या दीक्षांत समारंभात त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीत कृषी विषयातील पीएच.डी. पदवी अभ्यासक्रमात कृषिविद्या विषयातून संपूर्ण विद्यापीठात सर्वाधिक संचयी श्रेणी गुण सरासरी (सीजीपीए) प्राप्त करणाऱ्या



विद्यार्थ्याला हे सुवर्णपदक दिले जाते. विशेष म्हणजे, कोणत्याही प्रकारचे अपयश न येता विहित कालावधीत प्रथम श्रेणी आणि विशेष प्रावीण्यासह पीएच.डी. अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांची या पुरस्कारासाठी निवड केली जाते. या सर्व निकषांची पूर्तता करीत प्रिया शिंदे यांनी हा बहुमान मिळविला.विद्यापीठाचा २८ वा दीक्षांत समारंभ शुक्रवार, २० नोव्हेंबर रोजी उत्साहात पार पडला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. (डॉ.) इंद्र मणी होते. प्रमुख उपस्थितीमध्ये नास, नवी दिल्ली येथील सचिव डॉ. ए. के. सिंह, शिक्षण संचालक डॉ. बी. व्ही. ठोंबरे, संशोधन संचालक डॉ. भगवान आसेवार आणि विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश आहिरे यांचा समावेश होता. प्रिया शिंदे यांच्या पीएच.डी. संशोधन कार्यासाठी डॉ. डब्ल्यू. एन. नारखेडे यांनी मार्गदर्शक म्हणून काम पाहिले. तसेच डॉ. मिर्झा आय. ए. बी., डॉ. एस. यू. पवार, डॉ. व्ही. बी. आवसरमल आणि डॉ. आनंद गोरे यांचेही त्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले.कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि संशोधनातील गुणवत्तेच्या जोरावर प्रिया शिंदे यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल विद्यापीठातील प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.

माणुसकी अजूनही जिवंत! लंपी आजाराने त्रस्त बैलाला सामाजिक कार्यकर्ते शुभम ठाकुर यांचा मदतीचा हात

प्रतिनिधी/सागर पडोळे

डॉ. अर्पित दादा व मित्र परिवाराच्या सहकार्याने मुक्या जनावरावर उपचार; प्राणीसेवेचे सर्वत्र कौतुक नागपूर : छिंदवाडा रोडवरील महाजन लॉन्सजवळील साकड परिसरात लंपी आजाराने त्रस्त असलेला एक बैल अत्यंत गंभीर अवस्थेत असल्याची माहिती समोर आली. या आजारामुळे बैलाला मोठी दुखापत झाली होती. त्याची दयनीय अवस्था पाहता त्याला तातडीने वैद्यकीय मदतीची गरज होती.ही माहिती सामाजिक कार्यकर्ते शुभम ठाकुर यांना मिळताच त्यांनी क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी धाव घेत मदतीसाठी पुढाकार घेतला. डॉ. अर्पित दादा आणि त्यांच्या मित्र परिवाराच्या सहकार्याने या मुक्या जनावरावर उपचार करण्यात आले.मुक्या प्राण्यांच्या वेदना समजून घेऊन त्यांच्या मदतीसाठी धावून जाणे हीच खरी माणुसकी असल्याचे या कार्यातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. कोणतीही अपेक्षा किंवा स्वार्थ न ठेवता केवळ सेवाभावनेतून करण्यात आलेल्या या कार्याचे परिसरात कौतुक होत आहे.बोलता येत नाही म्हणून मुक्या प्राण्यांना वेदना होत नाहीत असे नाही. त्यामुळे संकटात सापडलेल्या पशुपक्ष्यांच्या मदतीसाठी प्रत्येकाने पुढाकार घेणे आवश्यक आहे.या सेवाकार्यात सहकार्य केल्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते शुभम ठाकुर यांनी डॉ. अर्पित दादा व सर्व मित्र परिवाराचे मनःपूर्वक आभार मानले.मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा, आणि मुक्या जीवांची सेवा हीच खरी माणुसकी!

डजिटल हयात प्रमाणपत्र तातडीने सादर करण्याचे आवाहन

- तहसीलदार डॉ. शिवाजी मगर

परभणी, दि.२०(जिमाका): सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या विशेष सहाय्य योजनेंतर्गत लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांनी डिजिटल हयात प्रमाणपत्र तातडीने सादर करावे. लाभार्थ्यांनी हयात प्रमाणपत्र सादर न केल्यास भविष्यात संबंधित लाभार्थ्यांचे अनुदान शासन स्तरावरून बंद होण्याची शक्यता आहे. त्यामुळे लाभ सुरू ठेवण्यासाठी प्रमाणपत्र सादर करावे, असे आवाहन तहसीलदार डॉ. शिवाजी मगर यांनी केले आहे.

राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना तसेच केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना आणि इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजना राबविण्यात येतात. या योजनांमधील केंद्र पुरस्कृत लाभार्थ्यांचे हयात प्रमाणपत्र डिजिटल पद्धतीने सादर करण्यासाठी शासनाने 'बेनिफिशरी सत्यापन ॲप' विकसित केले आहे.

या ॲपच्या माध्यमातून आधार प्रमाणीकरण व फेस ऑथेंटिकेशन प्रक्रिया पूर्ण करून डिजिटल हयात प्रमाणपत्र ऑनलाइन तयार करता येते. तयार झालेले प्रमाणपत्र केंद्र शासनाच्या एनएसएपी पोर्टलवर थेट अद्ययावत होणार असल्याने लाभार्थ्यांना प्रमाणपत्र सादर करण्याची प्रक्रिया सुलभ, सुरक्षित व पारदर्शक होणार आहे. वारंवार नोटीस तसेच आवाहन करूनही अनेक लाभार्थ्यांनी अद्याप सादर केलेले नाही. हयात प्रमाणपत्र सादर न केल्यास संबंधित लाभार्थ्यांचे अनुदान शासन स्तरावरून बंद होऊ शकते. त्यामुळे लाभार्थ्यांनी ही प्रक्रिया वेळेत पूर्ण करून आपले अनुदान सुरू ठेवावे.

मोबाईलवरून असे तयार करा हयात प्रमाणपत्र

लाभार्थ्यांनी गुगल प्ले स्टोअरवरून 'आधार फेस आरडी ॲप' आणि 'बेनिफिशरी सत्यपन ॲप-२' हे दोन ॲप डाउनलोड करावेत. त्यानंतर 'बेनिफिशरी सत्यपन ॲप' सुरू करून भाषा निवडावी व डिव्हाईस रजिस्ट्रेशन प्रक्रिया पूर्ण करावी. नोंदणीसाठी आधार क्रमांकासह मोबाईल क्रमांक किंवा ई-मेलवर प्राप्त होणाऱ्या ओटीपीच्या माध्यमातून प्रमाणीकरण करावे. नोंदणी पूर्ण झाल्यानंतर मोबाईलच्या कॅमेऱ्याद्वारे फेस ऑथेंटिकेशन प्रक्रिया पूर्ण करावी. यासाठी चेहऱ्याची ओळख पडताळणी करताना ॲपच्या सूचनांनुसार डोळ्यांची हालचाल करून सेल्फी द्यावा. प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर बेनिफिशरी व्हेरीफिकेशन सर्टीफिकेट अर्थात डिजिटल हयात प्रमाणपत्र ऑनलाइन प्राप्त होईल.

लाभार्थी ही प्रक्रिया स्वतःच्या मोबाईलवरून पूर्ण करू शकतात. तसेच सहकारी किंवा कुटुंबीयांच्या मदतीने, महा ई-सेवा केंद्र, तलाठी अथवा तहसील कार्यालयातील संजय गांधी विभागाच्या सहाय्याने डिजिटल हयात प्रमाणपत्र सादर करता येणार आहे. केंद्र पुरस्कृत वृद्धापकाळ, विधवा व दिव्यांग निवृत्तीवेतन योजनांच्या लाभार्थ्यांनी डिजिटल हयात प्रमाणपत्राची प्रक्रिया तातडीने पूर्ण करून शासनाच्या अनुदान योजनांचा लाभ अखंडित सुरू ठेवावा, असे आवाहन तहसीलदार डॉ. शिवाजी मगर यांनी केले आहे.

--*-*-*-*

राष्ट्रीय नवजात शिशु सप्ताहानिमित्त उपजिल्हा रुग्णालयात मार्गदर्शन




परभणी/प्रतिनिधी

नवजात बालकांचे आरोग्य, सुरक्षित संगोपन आणि निरोगी भविष्य सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने १५ ते २१ नोव्हेंबरदरम्यान राष्ट्रीय नवजात शिशु सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या सप्ताहानिमित्त २० नोव्हेंबर रोजी उपजिल्हा रुग्णालय, गंगाखेड येथे जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागेश लखमावार आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. किशोर सुरवसे यांच्या नियंत्रणाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. कालिदास निरस आणि बालरोगतज्ज्ञ डॉ. केशव मुंडे यांनी उपस्थितांना नवजात बालकांच्या आरोग्याची काळजी, पोषण आणि सुरक्षित संगोपनाबाबत मार्गदर्शन केले.बालकांच्या आयुष्यातील पहिले २८ दिवस अत्यंत महत्त्वाचे असतात. या काळात बालकांचे आरोग्य, पोषण आणि विकासाकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. विशेषतः अकाली जन्मलेली, कमी वजनाची तसेच विशेष नवजात शिशु काळजी कक्षातून () उपचार घेऊन घरी सोडलेल्या बालकांची नियमित आरोग्य तपासणी आणि पाठपुरावा करणे गरजेचे असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.व समुपदेशन केले जाणार आहे. बालक दूध पीत नसणे, असामान्य सुस्ती, तापमानात बदल, श्वास घेण्यास त्रास किंवा झटके येणे अशी लक्षणे दिसल्यास तातडीने शासकीय रुग्णालयात उपचार घ्यावेत, असे आवाहन करण्यात आले.कार्यक्रमाला नागरिक, माता-पिता, बालके, आरोग्य कर्मचारी आणि रुग्णालयातील कर्मचारी उपस्थित होते.

शिक्षणतज्ज्ञ शिवाजीराव पवार यांना 'लोकसंवाद जीवन गौरव पुरस्कार' जाहीर

हिंगोली/गोपाल सातपुते

हिंगोली ।मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई तसेच श्री यशवंतराव ग्रामविकास व शिक्षण प्रसारक मंडळ, करकाळा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २२व्या लोकसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाचा प्रतिष्ठेचा 'लोकसंवाद जीवन गौरव पुरस्कार २०२६' राज्यपाल पुरस्कारप्राप्त माजी शिक्षणाधिकारी तथा शिक्षणतज्ज्ञ शिवाजीराव पवार यांना जाहीर झाला आहे. त्यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.शिवाजीराव पवार यांनी शिक्षणाधिकारी म्हणून मराठवाड्यात उल्लेखनीय कार्य केले आहे. विशेषतः हिंगोली जिल्ह्यात त्यांच्या कार्यकाळात डिजिटल शिक्षणाच्या प्रसारासाठी त्यांनी विशेष पुढाकार घेत जिल्ह्याला डिजिटल शिक्षणाच्या



बाबतीत सक्षम बनविण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या या कार्याची दखल घेत राज्यपालांनी त्यांना पुरस्काराने सन्मानित केले होते. स्काऊट आणि गाईड चळवळीच्या माध्यमातूनही त्यांनी मोठ्या प्रमाणावर सामाजिक व शैक्षणिक कार्य केले आहे. श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक म्हणून ते आजही केजी ते पीजीपर्यंत दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी अविरत प्रयत्नशील आहेत. मराठवाड्यातील सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांचे योगदान मोलाचे मानले जाते. याशिवाय हिंगोली जिल्हा कुस्ती महासंघाच्या माध्यमातून कुस्ती क्षेत्राच्या विकासासाठीही ते सातत्याने कार्यरत आहेत. शैक्षणिक गुणवत्ता, ग्रामीण विकास, सामाजिक बांधिलकी आणि क्रीडा क्षेत्रातील त्यांच्या बहुआयामी कार्याचा गौरव म्हणून त्यांना २०२६ चा लोकसंवाद जीवन गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.२८ नोव्हेंबर रोजी पुरस्कार प्रदान २८ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित लोकसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. यावेळी नामदार हेमंत पाटील, ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत शेषरावजी मोरे, संमेलनाध्यक्ष तथा साहित्यिक आसाराम लोमटे, मराठी भाषा साहित्य महामंडळ मुंबईचे सदस्य साहित्यिक देविदास फुलारी, कथाकार दिगंबर कदम, साहित्यिक प्रा. महेश मोरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. शिवाजीराव पवार यांना प्रतिष्ठेचा जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाल्याने शैक्षणिक, सामाजिक व साहित्यिक क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

महाराष्ट्रातील निर्भिड साप्ताहिक रविवार

जगमित्र

विष्णू निवृत्ती कदम
(संपादक जालना, आवृत्ती), ९४२२९९१०३२, ७३८५८९०४४४

जालना — रविवार दि.२२ नोव्हेंबर २०२६ — पान नं.५

धनसिंह सूर्यवंशी यांच्या नामकरणाच्या मागणीला वाढता प्रतिसाद

जालना । प्रतिनिधी

जालना शहराचे नाव बदलून 'जनकपूर' करण्यात यावे, या मागणीने आता जोर धरला आहे. हिंदू महासभेनंतर शहरातील व्यापारी महासंघ आणि भाजपच्या नगरसेवकांनीही या मागणीला पाठिंबा दर्शविला आहे. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन जालन्याचे नामकरण 'जनकपूर' करण्याची मागणी करण्यात आली आहे. जालन्याचे नामकरण 'जनकपूर' करण्यात यावे, ही मागणी सर्वप्रथम हिंदू महासभेचे प्रदेश संघटन मंत्री धनसिंह सूर्यवंशी यांनी लावून धरली होती. सुरुवातीला एका संघटनेपुरती मर्यादित असलेली ही मागणी आता शहरातील विविध घटकांपर्यंत पोहोचली असून, व्यापारी आणि लोकप्रतिनिधींचा पाठिंबा मिळत असल्याने या विषयाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

दरम्यान, येत्या २३ नोव्हेंबर रोजी जालना महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा पार पडणार आहे. या सभेत जालन्यातील सर्वपक्षीय नगरसेवकांनी पक्षीय मतभेद बाजूला ठेवून जालन्याचे नाव 'जनकपूर' करण्याच्या मागणीसाठी ठराव मांडावा आणि एकमुखाने आवाज उठवावा, असे आवाहन हिंदू महासभेचे प्रदेश संघटन मंत्री धनसिंह सूर्यवंशी यांनी केले आहे. व्यापारी महासंघ आणि भाजप नगरसेवकांनी दिलेला पाठिंबा पाहता नामकरणाच्या मागणीला व्यापक स्वरूप प्राप्त होत आहे. आता महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत नगरसेवक काय भूमिका घेतात आणि शासनस्तरावर याबाबत काय निर्णय होतो, याकडे संपूर्ण जालना शहराचे लक्ष लागले आहे. धनसिंग सूर्यवंशी यांच्या पुढाकाराला मिळत असलेला वाढता पाठिंबा पाहता जालना शहराच्या नामकरणाचा मुद्दा आगामी काळात निर्णायक वळण घेण्याची शक्यता आहे.

गवळी मोहल्ला घरफोडीचा छडा; मुख्य आरोपीसह चोरीचे सोने घेणारा सोनार जेरबंद

स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; ३ तोळे ७४६ मिलिग्रॅम सोन्याचा मुद्देमाल हस्तगत

जालना । ज्ञानेश्वर साळुंके

जुना जालना येथील गवळी मोहल्ला परिसरातील एका बंद घराचे कुलूप तोडून साडेचार तोळे सोन्याचे दागिने लंपास करणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने (डउइ) अवघ्या २४ तासांत पर्दाफाश केला आहे. याप्रकरणी पोलिसांनी मुख्य आरोपीला अटक केली असून तीन विधीसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेतले आहे. तसेच, चोरीचे सोने वितळवून घेणाऱ्या एका सोनारालाही बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.

गवळी मोहल्ला येथील रहिवासी उमाकांत चंद्रकांत लालसरे (वय ५७) हे १२ ते १९ नोव्हेंबर २०२६ दरम्यान सहकुटुंब परतूर येथे गेले होते. ही संधी साधून अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराचा पाठीमागील दरवाजा तोडून लोखंडी कपाटातील २.५ तोळे वजनाचा सोन्याचा हार आणि २ तोळे वजनाचे मंगळसूत्र असा मुद्देमाल चोरून नेला होता. याप्रकरणी २०



नोव्हेंबर रोजी कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

असा लागला गुन्ह्याचा छडा

पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव व त्यांच्या पथकाने समांतर तपास सुरू केला. तांत्रिक तपास व गुप्त माहितीच्या आधारे हा गुन्हा इंदिरानगर (जुना जालना) येथील आकाश राजू तिडके (वय १८) याने आपल्या तीन विधीसंघर्षग्रस्त बालक साथीदारांच्या मदतीने केल्याचे निष्पन्न झाले.

पोलिसांनी आकाश तिडके याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्याकडून २.५ तोळे सोन्याचा हार आणि १२.४६० ग्रॅम वजनाचे तुटलेले मंगळसूत्र असा एकूण ३ तोळे ७४६ मिलिग्रॅम सोन्याचा ऐवज जप्त करण्यात आला. उर्वरित ८ ग्रॅम सोन्याचा तुकडा त्याने शास्त्री मोहल्ला येथील 'रहमान ज्वेलर्स'चा संचालक सय्यद महेफिजुर रहमान अली (वय २२, रा. संजयनगर) याला देऊन त्याची सोन्याची गोळी बनवून घेतल्याचे सांगितले. त्यानुसार पोलिसांनी संबंधित सोनारालाही ताब्यात घेतले असून पुढील तपासासाठी सर्व आरोपींना कदीम जालना पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

या पथकाने केली कारवाई

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, पोउपनि राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार रमेश राठोड, सागर बावीस्कर, दत्ता वाघुंडे, आक्रुर धांडगे, बाबा गायकवाड, शिवप्रसाद एखंडे, कैलास चेके, रमेश काळे, धिरज भोसले, योगेश सहाणे व अशोक जाधवर यांनी पार पाडली.

गुंतवणुकीच्या आमिषाने १.७५ कोटींची फसवणूक; आरोपी पंकज राठोड मुळशीतून जेरबंद

न्यायालयाकडून ४ दिवसांची पोलीस कोठडी मंजूर; मुख्य सूत्रधार सचिन राठोडसह इतर आरोपींचा शोध सुरू

जालना । ज्ञानेश्वर साळुंके

प्लॉटींग व्यवसाय आणि जमीन खरेदीच्या व्यवहारात गुंतवणुकीवर भरघोस परताव्याचे आमिष दाखवून १ कोटी ७५ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणातील आरोपी पंकज नामदेव राठोड याला आर्थिक गुन्हे शाखेच्या (एजथ) पथकाने पुणे जिल्ह्यातील मुळशी येथून अटक केली आहे. न्यायालयाने त्याला ४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

अटकेची कारवाई: गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपी आपले मोबाईल बंद ठेवून अस्तित्व लपवत फरार होते. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली गोपनीय माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आर्थिक गुन्हे शाखेने २० नोव्हेंबर २०२६ रोजी पंकज राठोड याला मुळशी येथून ताब्यात घेतले. न्यायालयात हजर केले असता ४ दिवसांची पोलीस कोठडी मंजूर करण्यात आली.



गुन्ह्याची पार्श्वभूमी: २०२१ मध्ये मुख्य सूत्रधार सचिन नामदेव राठोड व त्याच्या साथीदारांनी प्लॉटींग व्यवसायात गुंतवणुकीवर दरमहा १० टक्के निश्चित परताव्याचे आमिष दाखवले होते. विश्वास संपादन करण्यासाठी बनावट ७/१२ उतारे, अकृषक परवाने, नोटरी करारनामा व धनादेश देत फिर्यादी आशीष अविनाश चव्हाण यांच्याकडून सुरुवातीला १ कोटी ५० लाख रुपये उकळण्यात आले. परतावा न मिळाल्याने २०२२ मध्ये बिडकीन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होऊन सचिन राठोडला अटक झाली होती.

पुढील फसवणूक व गुन्हा नोंद: तुरुंगातून बाहेर आल्यानंतरही बोकुड जळगाव (ता. पैठण) येथील जमीन नावावर करून देण्याचे आमिष दाखवून फेब्रुवारी २०२४ मध्ये पुन्हा २० लाख रुपये (१० लाख धनादेश व १० लाख रोख) घेण्यात आले. अशा प्रकारे एकूण १ कोटी ७५ लाख रुपयांची फसवणूक झाल्याप्रकरणी कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ४०७/२०२६ नुसार विविध कलमे आणि अनियमित ठेव योजनांवर प्रतिबंध घालणारा अधिनियम, २०१९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी, पोलीस उपअधीक्षक बाळासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक मिथुन घुगे, पोलीस उपनिरीक्षक शैलेश म्हस्के व पथकाने पार पाडली. गुन्ह्याचा पुढील तपास सुरू असून फरार आरोपींचा शोध घेतला जात आहे.

अंबड शहरातील अतिक्रमण कारवाईच्या मागणीसाठी बाबासाहेब खरात यांचे पुन्हा आमरण उपोषण

अंबड । ज्ञानेश्वर साळुंके

अंबड शहरातील कथित अनधिकृत अतिक्रमण हटवण्याच्या मागणीसाठी आणि प्रशासनाने दिलेल्या लेखी आश्वासनाची पूर्तता न झाल्याच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब हरिभाऊ खरात यांनी पुन्हा आमरण उपोषण सुरू केले आहे. उपविभागीय अधिकाऱ्यांकडे केलेल्या लेखी तक्रारीनंतर त्यांनी अंबड नगर परिषदेसमोर उपोषणाची भूमिका घेतली आहे.

बातमीत नमूद माहितीनुसार, खरात यांनी यापूर्वीही अतिक्रमणाविरोधात नगर परिषद आणि तहसील कार्यालयाकडे तक्रारी केल्या होत्या. सन २०२२ मध्ये नगर परिषदेने शहरातील जुन्या लिलावातील ३८४ गाळे व जागांचे करार रद्द करून त्या ताब्यात घेण्यासाठी संबंधितांना नोटिसा बजावल्या होत्या, असा संदर्भ त्यांनी दिला आहे. विशेषतः सर्वे क्रमांक ८७ मधील तसेच रस्तालगतच्या नगर परिषदेच्या जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही झालेली नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. सर्वे क्रमांक ८७ मधील नगर परिषदेच्या मोकळ्या जागेवर कोणतीही परवानगी किंवा करार नसताना नवीन बांधकाम सुरू करण्यात आल्याचा आरोप खरात यांनी केला आहे.



खरात यांच्या निवेदनानुसार, या प्रकरणी तहसील कार्यालय आणि उपविभागीय कार्यालयाकडून संबंधित बांधकामाबाबत आणि जागा ताब्यात घेण्याबाबत आदेश देण्यात आले होते. मात्र, त्यानंतरही अपेक्षित कार्यवाही झाली नसल्याचा त्यांचा आरोप आहे. त्यांनी प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत संबंधित अतिक्रमण धारकावर कारवाई करून जागा नगर परिषदेच्या ताब्यात घ्यावी, अशी मागणी केली आहे.

यापूर्वी १ ते ४ नोव्हेंबर दरम्यान खरात यांनी आमरण उपोषण केले होते. त्यावेळी नगर परिषद प्रशासनाकडून सात दिवसांत अंतिम नोटीस देऊन कागदपत्रे मागवली जातील आणि कागदपत्रे सादर न केल्यास नियमानुसार कारवाई केली जाईल, असे लेखी आश्वासन देण्यात आल्याचे सांगितले जाते. मात्र, दिलेल्या मुदतीत कारवाई झाली नसल्याचे सांगत खरात यांनी पुन्हा उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे. याबाबत प्रशासनाची अधिकृत प्रतिक्रिया अद्याप उपलब्ध झालेली नाही.

याच महिन्यात मी अतिक्रमणाच्या प्रश्नावर आमरण उपोषण केले होते. त्यावेळी दिवाळीचे कारण पुढे करत सात दिवसांत कारवाईचे लेखी आश्वासन देण्यात आले होते. मात्र, अद्याप कारवाई झालेली नसल्याने मला पुन्हा उपोषणाला बसावे लागले आहे. मी दिव्यांग असून थंडीच्या काळात उपोषण करत असल्याने थंडीचा तसेच संबंधितांकडून त्रास होण्याचा धोका वाटत आहे.

– बाबासाहेब हरिभाऊ खरात

जालना ज्येष्ठ नागरिक मंचच्या अध्यक्षपदी प्रा.रावसाहेब ढवळे; महासचिव पदी धर्मा खिल्लारे यांची निवड

जालना । प्रतिनिधी

येथील जालना ज्येष्ठ नागरिक मंचची विस्तारित कार्यकारिणी सदस्यांची बैठक अध्यक्ष तुळशीराम पाटील शेळके यांच्या अध्यक्षतेखाली मराठा सेवा संघ, खा.भाऊसाहेब देशमुख सभागृह, भाग्यनगर, जुना जालना येथे दि.२१ शनिवार रोजी संपन्न झाली. या बैठकीमध्ये मंचच्या अध्यक्षपदी प्रा.डॉ.रावसाहेब ढवळे यांची तर महासचिव पदी धर्मा खिल्लारे यांची निवड करण्यात आली. उर्वरित कार्याकारिणीमध्ये उपाध्यक्ष अँड.सोपानराव भांदरगे, मोहन राठोड, कार्याध्यक्ष लक्ष्मीकांत कंकाळ, सचिव प्रा.राजकुमार बुलबुले, सहसचिव काकासाहेब खरात, कोषाध्यक्ष किसनराव मिसाळ, सहकोषाध्यक्ष प्रकाश गडवे, समन्वयक एकनाथराव गायकवाड, प्रसिध्दीप्रमुख हिरालाल पिंपरिये यांची सर्वांनुमते नवीन पदाधिकारी म्हणून निवड करण्यात आली. नवीन पदाधिकारी यांचे अभिनंदन करण्यात येवून शुभेच्छा देण्यात आल्या. या विस्तारित बैठकीचे यजमान नंदकिशोर पुंड यांनी सर्वांचे प्रारंभी स्वागत केले.बैठकीचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन धर्मा खिल्लारे यांनी केले. जमाखर्चाचा हिशोब किसनराव मिसाळ यांनी सादर केला. बैठकीत मंचचे कार्य प्रभावी व सर्वसमावेशक करण्याच्या दृष्टिकोनातून समर्पक चर्चा करून निर्णय घेण्यात आले. शेवटी आभार प्रा.राजकुमार बुलबुले यांनी मानले. बैठकीस कार्याकारिणी सदस्य डॉ.रविप्रकाश उजवणे, बाळकृष्ण शहापूरकर, सुभाष देठे, राजाभाऊ कुलकर्णी, रामेश्वर वाघमारे, बन्सी जाधव, वसंतराव खिल्लारे यांची उपस्थिती होती.

पिक विम्याच्या मागणीसाठी शेतकऱ्यांचा संताप

शेतकरी संघर्ष समिती च्या वतीने जिल्हा कृषी अधीक्षक यांना निवेदन सादर

दौऱ्याच्या नावाखाली अधिकारी गैरहजर

जालना । प्रतिनिधी

जालना शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने शेतकऱ्यांना न्याय मिळावा या दृष्टिकोनातून जिल्हा कृषी अधीक्षक त्यांची भेट घेऊन शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने त्यांना विविध मागण्याचे निवेदन नुकतेच सादर करण्यात आले आहे.

या निवेदनामध्ये मोसंबी, द्राक्ष, सोयाबीन व कापूस पिकाचे पिक विमा तात्काळ मंजूर करून शेतकऱ्यांचा खात्यात जमा करावे तसेच फळबाग विम्यापासून वंचित शेतकऱ्यांना न्याय द्यावा यासाठीजालना तालुक्यातील रामनगर, मंडळ, पाचनवडगाव मंडळ, सावंगी तलाव मंडळ,शेवली मंडळ, विरेगाव मंडळ, नेर मंडळातील अनेक शेतकऱ्यांना मोसंबी, द्राक्ष, सोयाबीन,व कापूस पिकाचां पिक विमा अद्याप मिळालेला नाही तसेच रामनगर मंडळातील अनेक फळबाग उत्पादक शेतकरी फळबाग पिक विमा लाभापासून पुर्णपणे वंचित आहे, यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून त्यांच्यावर अन्याय होत आहे. त्यामुळे शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने निवेदन देण्यात आले आठवड्याच्या आत लेखी माहिती द्यावी, अन्यथा शेतकऱ्यांचा न्याय हक्कासाठी शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

यावेळी शेतकरी संघर्ष समितीचे मुख्य समन्वयक मुरलीधर शेजुळ, शेतकरी संघर्ष समिती संस्थापक अध्यक्ष भगवानराव नाईकनवरे, शेतकरी संघर्ष समिती मराठवाडा अध्यक्ष अंकुश राजे जाधव, शेतकरी संघर्ष समिती चे जिल्हाध्यक्ष, गजानन पाटील भांडवले तसेच भरत आर.सावंत, प्रसिद्धी प्रमुख कदिर बापू सय्यद, अशोक बिटले, शरद खांडेभराड, सुशिल सराटे, उमेश फासाटे, दशरथ मोरे, दत्तात्रय कदम, काकासाहेब साबळे, विनायक शिंदे, पांडुरंग उबाळे, नागोराव मामा थेटे, अंकुश लकडे रंगनाथ शिंदे इत्यादी पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

सफाई कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी राहुल करनाडे यांचे राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाकडे निवेदन

वेतन, आरोग्य सुविधा, सुरक्षा साहित्य व सामाजिक संरक्षणासाठी राज्यस्तरीय सर्वेक्षणाची मागणी

जालना । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रातील सफाई कर्मचाऱ्यांच्या विविध समस्या आणि प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते राहुल सत्यनारायण करनाडे यांनी विजय ओमप्रकाश भगत यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य रवी रामू कळ्होसे यांना जिल्हाधिकारी, जालना यांच्यामार्फत १७ नोव्हेंबर रोजी निवेदन सादर केले. या निवेदनात राज्यातील कायमस्वरूपी, कंत्राटी व रोजंदारी सफाई कर्मचाऱ्यांचे राज्यस्तरीय सर्वेक्षण करावे, किमान वेतन व नियमित पगार मिळावा, थकीत वेतन अदा करावे, झाडू व एडखउ सुविधा लागू कराव्यात, नियमित आरोग्य तपासणी करावी आणि आवश्यक सुरक्षा साहित्य उपलब्ध करून द्यावे, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

तसेच लाड-पागे समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी, महिला सफाई कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र सुविधा, पात्र कर्मचाऱ्यांना घरकुल व सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ आणि गटार व सेप्टिक टँक सफाईसाठी आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर करण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. दरम्यान, १८ नोव्हेंबर रोजी विविध वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार, राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य रवी रामू कळ्होसे यांनी जालना महानगरपालिका प्रशासनाला कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतन वितरणातील अनियमिततेची चौकशी करून महिनाभरात अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच कर्मचाऱ्यांचे वेतन थेट बँक खात्यात जमा करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. सफाई कर्मचाऱ्यांना सन्मान, सुरक्षितता आणि सामाजिक न्याय मिळावा, त्यांच्या समस्यांवर प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन निवेदनातील मागण्यांवर नियमानुसार कार्यवाही करावी, अशी मागणी राहुल सत्यनारायण करनाडे यांनी केली.

– राहुल सत्यनारायण करनाडे
सामाजिक कार्यकर्ते, जालना, महाराष्ट्र.

परतूर येथे दुष्काळ आढावा बैठक संपन्न; आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते चारा बियाण्यांचे वाटप

परतूर । प्रतिनिधी

आज तहसील कार्यालय, परतूर येथे दुष्काळ परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती, शेतकऱ्यांच्या समस्या, जनावरांसाठी चारा उपलब्धता तसेच चारा लागवडीच्या नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी बबनरावजी लोणीकर (माजी मंत्री तथा विद्यमान आमदार, परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघ) यांच्या हस्ते शेतकऱ्यांना चारा लागवडीसाठी चारा बियाण्यांचे वाटप करण्यात आले. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता निर्माण व्हावी, शेतकऱ्यांना दिलासा मिळावा आणि चारा टंचाईवर मात करता यावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. बँक मॅनेजरांना आमदार लोणीकरांचे स्पष्ट निर्देश!

यावेळी आमदार बबनरावजी लोणीकर साहेब यांनी उपस्थित सर्व बँकांच्या मॅनेजरांना स्पष्ट शब्दांत ठणकावून सांगितले की, तालुक्यातील एकही पात्र शेतकरी कर्जपुरवठ्यापासून वंचित राहता कामा नये.



प्रत्येक पात्र शेतकऱ्याला नियमानुसार कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी बँकांनी सकारात्मक भूमिका घ्यावी. शेतकऱ्यांना बँकेतून विनाकारण हेलपाटे मारायला लावू नयेत. कोणत्याही शेतकऱ्याशी उद्धटपणे किंवा अरेरावीची भाषा वापरू नये, तसेच कोणावरही हुकूमशाही गाजवू नये. शेतकऱ्यांशी सन्मानाने वागून त्यांना आवश्यक ते सहकार्य करावे, असे स्पष्ट निर्देश त्यांनी सर्व बँक मॅनेजरांना दिले.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून परतूर तालुक्याच्या उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, तहसीलदार भारत गंगावणे साहेब, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी (इऊअ) कौशल्य पाटील यांच्यासह व, पशू वैद्यकीय अधिकारी सचिन गायकवाड, तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी, पोलीस विभागाचे अधिकारी व कर्मचारी, पंचायत समितीचे कर्मचारी, ग्रामसेवक, कृषी अधिकारी तसेच तालुक्यातील विविध बँकांचे मॅनेजर उपस्थित होते. यावेळी सर्व विभागांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेत शेतकरी आणि पशुपालकांना आवश्यक सहकार्य करण्याबाबत चर्चा केली. शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी एकत्रितपणे प्रयत्नशील असल्याचे यावेळी दिसून आले.

कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचा २५ नोव्हेंबरला कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नाबाबत मुंबईत एल्गार : जिल्हाध्यक्ष विनोद भगत

पदोन्नतीतील आरक्षण, जुनी पेन्शन व रिक्त अनुशेष पदांसाठी आझाद मैदानावर राज्यव्यापी धरणे आंदोलन

जालना । प्रतिनिधी

भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानता, सामाजिक न्याय आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला आहे. मात्र, संविधानिक हक्क आणि आरक्षणाच्या तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी आजही मागासवर्गीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना संघर्ष करावा लागत आहे. या प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, महाराष्ट्र राज्य आणि कास्ट्राईब शिक्षक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, २५ नोव्हेंबर २०२६ रोजी मुंबईतील आझाद मैदानावर राज्यस्तरीय धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. राज्यातील अधिकारी, कर्मचारी व शिक्षकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महासंघाचे जिल्हाध्यक्ष विनोद भगत यांनी केले आहे.

महासंघाचे राज्याध्यक्ष कृष्णा इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली हे आंदोलन होणार आहे. सन २०१७ पासून मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीतील आरक्षणाचा प्रश्न प्रलंबित आहे. यासाठी महासंघाने शासनाकडे वारंवार निवेदने देऊन, बैठका घेऊन आणि विविध आंदोलने करून पाठपुरावा केला. मात्र, अद्याप ठोस निर्णय झालेला नसल्याने अनेक पात्र अधिकारी-कर्मचारी पदोन्नतीपासून वंचित राहिले आहेत. केंद्र शासनाने १५ जून २०१८ रोजी राज्यांच्या मुख्य सचिवांना पदोन्नतीतील आरक्षणासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांच्या अनुषंगाने राज्य शासनानेही ठोस धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आहे.



राज्यातील विविध शासकीय व निमशासकीय विभागांमध्ये मागासवर्गीयांचा सुमारे अडीच लाख पदांचा अनुशेष रिक्त असल्याचा महासंघाचा दावा आहे. हा अनुशेष तातडीने भरावा, नियमित नोकरभरती राबवावी, कंत्राटी भरतीच्या धोरणाचा पुनर्विचार करावा आणि आरक्षित पदे नियमानुसार भरावीत, अशी मागणी करण्यात येणार आहे. तसेच पात्र कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करून सेवानिवृत्तीनंतर आर्थिक सुरक्षितता द्यावी, अशीही मागणी आहे.

याशिवाय विविध संवर्गांतील वेतनत्रुटी दूर करणे, पदोन्नतीतील अडथळे दूर करणे, वाहनचालक व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविणे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या मान्य करणे तसेच दिव्यांग शाळांमधील कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक समस्या सोडविण्याची मागणी आंदोलनातून करण्यात येणार आहे.

केवळ निवेदने आणि आश्वासनांवर अवलंबून न राहता संविधानिक हक्कांच्या संरक्षणासाठी संघटितपणे आवाज उठविण्याची वेळ आली आहे. त्यामुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय तसेच सर्व मागासवर्गीय अधिकारी, कर्मचारी व शिक्षकांनी आपापसातील मतभेद बाजूला ठेवून एकजुटीने आंदोलनात सहभागी व्हावे. राज्यातील शासकीय, निमशासकीय, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, महामंडळे आणि विविध शैक्षणिक संस्थांमधील कर्मचाऱ्यांनी २५ नोव्हेंबरला आझाद मैदानावर उपस्थित राहावे, असे आवाहन महासंघाचे कार्याध्यक्ष गणेश मडावी, महासचिव सुरेश तांबे, सरचिटणीस प्रभाकर सोनडवले, वरिष्ठ उपाध्यक्ष सुमित भुईगळ, सल्लागार राज इंगळे व जिल्हा पदाधिकारी भानुदास काळे, सरोज बिडला, गोविंद इंगळे, प्रदीप मघाडे, ओबेद कुरेशी, नरेंद्र जोशी, रामेश्वर कुबेर, संदीप खरात, भगवान तायड, राहुल लालझरे, अनिल एडके, गजानन मगर, संदीप इंगळे व सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

weekly 22 Nov 2026_Layout 1 11/22/2026 12:19 AM Page 2

सत्ता असो वा नसो,लोकांच्या हृदयात स्थान मिळवणारीच खरी लोकनेत्री

अजिंक्य डीवाय पाटील विद्यापीठाच्या लोकनेत्री कार्यक्रमाचे ना.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते पुण्यात उदघाटन



पुणे -केवळ निवडणूक जिंकून एखाद्या पदावर विराजमान होणे म्हणजे लोकनेता होणे नव्हे. लोकप्रतिनिधी पाच वर्षांसाठी निवडून येतो. मात्र, खरा लोकनेता किंवा लोकनेत्री सत्तेत असो अथवा नसो, त्याचे स्थान कायम लोकांच्या हृदयात असते. महिलांनी राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात नेतृत्व करताना संयम, साहस, सातत्य आणि स्वतःच्या मूल्यांशी प्रामाणिक राहण्याची वृत्ती जोपासली पाहिजे, असे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरण आणि पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी केले.

अजिंक्य डीवाय. पाटील विद्यापीठात स्कूल ऑफ गव्हर्नन्सच्या वतीने आयोजित लोकनेत्री महिला नेतृत्व विकास कार्यक्रमाचे उद्घाटन ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज झाले, त्यावेळी त्या बोलत होत्या. देशभरातील ४० महिला नेतृत्वकर्त्यांसाठी आयोजित या उपक्रमात पंकजाताई मुंडे यांनी आपला राजकीय प्रवास, संघर्ष, विजय-पराभवाचे अनुभव आणि महिला नेतृत्वासमोरील आव्हाने यावर मनमोकळेपणाने भाष्य केले.यावेळी अजिंक्य डीवाय पाटील ग्रुपच्या चेअरपर्सन पूजा पाटील, उपाध्यक्ष ईश पाटील, कुलगुरू डॉ. राकेश कुमार जैन, **(पान २ वर)**

परळी आगारातील कोणताही मनमानी कारभार खपवून घेतला जाणार नाही-सुंदर गित्ते

नंदागौळ मार्गे परळी लातूर बससेवा मागील १ महिन्यापासून जाणीवपूर्वक बंद!



परळी(प्रतिनिधी) परळी ते लातूर हि बससेवा नंदागौळ मार्गे पूस जवळगाव बर्दापुर या मार्गाने मागील डिसेंबर २०२४ पासून सुरु असून या २ वर्षाच्या काळात या बसला प्रवाशांच्या संख्या मोठी असताना,परिवहन विभागाला उत्पन्न मिळत असताना ३ वेळा जाणीवपूर्वक बंद करण्यात आली आहे, त्यामुळे नागरिक व प्रवाशांनी केलेल्या तक्रारी नुसार आगारात जाऊन आगार प्रमुख सोनवणे यांना बसला उत्पन्न व प्रवाशांची मागणी असताना कुणाच्या आदेशाने बस बंद केली असा जाब विचारला असता आगार प्रमुखांनी तात्काळ नंदागौळ मार्गे परळी - लातूर हि बस जाताना व येताना सुरु करण्या संदर्भातील लेखी पत्र दिले असून,परळी आगारात सुरु असलेला मनमानी कारभार खपवून घेणार नसल्याचा इशारा सरपंच सुंदर गित्ते यांनी यावेळी दिला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त कि,नंदागौळ मार्गे परळी ते लातुर ही बससेवा मागील २३ महिन्यापासून परळी,**(पान २ वर)**

अहो गोगावले अगोदर पुवच्या रोजगार हमी योजनेतील शेतकऱ्यांना पैसे द्या-विलास ताटे

परळी वार्ताहर - अगोदर अनेक वर्षांपासुन शासनाने जाहिर केलेली विहिर रोजगार हमी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांनी स्वखर्चाने पाडलेली आहे. त्याचे पैसे अगोदर द्यावे अशी मागणी ओबीसी परिषदेचे तालुका अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते विलासराव ताटे यांनी केली आहे. अनेक वर्षांपासून शासनाने जाहिर केल्याप्रमाणे अनेक शेतकऱ्यांनी शासनाने मान्य केल्यामुळे स्वखर्चातून शेतात विहिर पाडली. रोजगार हमी योजनेचे व नियमाप्रमाणे शेतकऱ्यांना द्यावयाचे पैसे अद्याप देण्यात न आल्यामुळे सर्व शेतकरी संकटात आहे. तेव्हा सर्व शेतकऱ्यांचे रोजगार हमी योजनेअंतर्गत चे सर्व पैसे द्यावेत. तद्नंतरच आपण आता जाहिर केलेले ६,७२८ कोटी चे बजट कामासाठी वापरावे अशी मागणी विलासराव ताटे यांच्यासह भिमराव सातपुते, मिलद घाडगे, प्रसन्नजीत रोडे, संजय मुंडे, प्रा. अंबादास बर्वे, पा. दिलीप सोनवणे, प्रा. नागेश फुलारी, राजेश रोडे, साहेब रोडे, राजेश सरवदे, बाबा सरवदे, नामदेव मुळे, पांडूरंग दुधाने, आदींनी केली आहे.

शासन पुर्वीचे पैसे देत नाही आणि नविन ६७२८ कोटी रूपये कोणाच्या **(पान २ वर)**

पोलीस पाटलांच्या मागण्यांसाठी हिवाळी अधिवेशनात आवाज उठविणार-आ.सोळंके

धारूर/अतूल शिनगारे

पोलीस पाटलांच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात महाराष्ट्र राज्य गावकामगार पोलीस पाटील संघाच्या वतीने माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाशदादा सोळंके यांना निवेदन देण्यात आले. आगामी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात पोलीस पाटलांचे प्रश्न विधिमंडळात मांडून न्याय मिळवून देण्याची मागणी यावेळी करण्यात आली. पोलीस पाटलांच्या मागण्या रास्त असून त्या अधिवेशनात मांडून मान्य करून घेण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही आमदार



सोळंके यांनी दिली.

पोलीस पाटलांना ४० हजार रुपये मानधन द्यावे, निवृत्तीचे वय ६० वरून ६५ वर्षे करावे, पोलीस व महसूल विभागातील भरती प्रक्रियेत कार्यरत पोलीस पाटील आणि त्यांच्या पाल्यांना पाच टक्के आरक्षण द्यावे, तसेच निवृत्तीनंतर ५० लाख रुपयांचे निवृत्ती लाभ द्यावेत, अशा प्रमुख मागण्यांचा निवेदनात समावेश आहे.दरम्यान, बीड जिल्ह्यात सात महिन्यांपूर्वी नियुक्त झालेल्या पोलीस पाटलांना अद्याप गावस्तरीय **(पान २ वर)**

अवैध धंदेवाल्यांनो,आता तुमची खैर नाही!

माजलगाव ग्रामीण पोलीस ॲक्शन मोडमध्ये;एपीआय देवकते यांची गंगामसला येथील अवैध पत्त्याच्या क्लबवर धाड

गंगामसला येथे रंगनाथ गिरी सह पाच जणांविरुद्ध जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा; ४ लाख ६४ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

माजलगाव/परमेश्वर सोळंके

माजलगाव तालुक्यात अवैध धंदे करणाऱ्यांविरोधात आता ग्रामीण पोलिसांनी आक्रमक भूमिका घेतली असून, अवैध धंदेवाल्यांचे धाबे दणाणले आहेत. गंगामसला येथील शिवारातील भारत पेट्रोलपंपाच्या बाजूला शेतात बाबळीच्या झाडाखाली सुरू असलेल्या अवैध पत्त्याच्या जुगार अड्ड्यावर माजलगाव ग्रामीण पोलिसांनी धाड टाकून सहा जणांविरुद्ध कारवाई केली. या कारवाईत रोख रकमेसह सहा मोबाईल आणि सात मोटारसायकली असा एकूण ४ लाख ६४ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १९ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास गंगामसला येथील शिवारात काही जण विनापरवाना एकत्र बसून आर्थिक फायद्यासाठी पत्त्यांवर पैसे लावून तिरट नावाचा जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाड टाकून सहा जणांना ताब्यात घेतले.

या कारवाईत २ हजार ७०० रुपये रोख रक्कम, विविध कंपन्यांचे सहा मोबाईल अंदाजे ७७ हजार रुपये किमतीचे आणि विविध कंपन्यांच्या जुन्या सात मोटारसायकली अंदाजे ३ लाख ८५ हजार रुपये किमतीच्या असा एकूण ४ लाख ६४ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५०६/२०२६ अन्वये महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक विजय रामोड यांच्या आदेशाने ही कारवाई करण्यात आली असून, पोलीस उपनिरीक्षक देवकते यांच्याकडे पुढील तपासाची जबाबदारी देण्यात आली आहे.या कारवाईमुळे गंगामसला परिसरातील अवैध जुगार अड्डे चालविणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. माजलगाव ग्रामीण पोलिसांनी अवैध धंद्यांविरोधात सुरू केलेली ही कारवाई पुढेही अशीच सुरू राहणार का, याकडे तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

कारवाई करण्यात आलेले सहा आरोपी :
१) नईम पाशा इस्माईल शेख (वय ४४, रा. सोमठाणा)
२) अशोक वैजनाथ पवार (वय ३९, रा. पवारवाडी)
३) हालीम खान नूरखान पठाण (वय ५०, रा. सरवर पिंपळगाव)
४) रंगनाथ बाबुराव गिरी (वय ३९, रा. पिताजी नगरी)
५) रमाकांत मुखाराम शेजूळ (वय ३६, रा. आबेगाव)
६) हरीभाऊ नारायण चव्हाण (वय ३८, रा. ब्रह्मगाव).
गंगामसला येथील अवैध पत्त्याच्या जुगार अड्ड्यावर माजलगाव ग्रामीण पोलिसांनी धाड टाकून वरील सहा जणांवर कारवाई केली. यावेळी २ हजार ७०० रुपये रोख, सहा मोबाईल आणि सात मोटारसायकली असा एकूण ४ लाख ६४ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल **(पान २ वर)**

धारूरमध्ये प्रथमच प्राणिक हीलिंग परिचय सत्राला उत्स्फूर्त प्रतिसाद

आरोग्यदायी जीवनशैली आणि सकारात्मकतेसाठी नागरिकांचा पुढाकार



धारूर/अतुल शिनगारे

धारूर शहरात प्रथमच १७ ते २० नोव्हेंबरदरम्यान आयोजित करण्यात आलेले चार दिवसीय प्राणिक हीलिंग परिचय सत्र उत्साहात संपन्न झाले. कटघरपुरा येथील रामप्रसाद भवनमध्ये पार पडलेल्या या १६ तासांच्या सत्राला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रा. नितेंद्र शुक्ला व सौ. किरण शुक्ला यांच्या पुढाकारातून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

मुंबई येथील 'डिव्हाईन फ्युजन प्राणिक हीलिंग आणि आर्हेटिक योग केंद्रा'च्या **(पान २ वर)**

राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष संभाजीराव आबा शेजुळ यांना वाढदिवसाच्या शुभेच्छांचा वर्षाव!



माजलगाव । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजलगाव तालुकाध्यक्ष तथा आमदार प्रकाशदादा सोळंके यांचे निष्ठावान समर्थक आदरणीय संभाजीराव आबा शेजुळ यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त त्यांना विविध क्षेत्रांतील मान्यवर, मित्रपरिवार व कार्यकर्त्यांकडून शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी संपादक परमेश्वर सोळंके, संपादक बाळासाहेब आडागळे, संपादक संतोष रासवे, सचिन शेजुळ **(पान २ वर)**

होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेच्या पाच सराव परीक्षा मोफत

डॉ.ए.पी.जे.अॅकॅडमीचा उपक्रम;सहावी व नववीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेची तयारी करण्याची संधी

परळी / प्रतिनिधी- विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाची आवड निर्माण व्हावी आणि त्यांना स्पर्धा परीक्षांची चांगली तयारी करता यावी, यासाठी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अॅकॅडमी, परळी वैजनाथ यांच्या वतीने होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेच्या पाच सराव परीक्षा मोफत घेण्यात येणार आहेत. इयत्ता सहावी आणि नववीच्या विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या विज्ञान विषयातील ज्ञान, विचार करण्याची क्षमता आणि समज तपासणारी परीक्षा आहे. यावर्षी मुख्य परीक्षा २८ नोव्हेंबर २०२६ रोजी होणार आहे. या परीक्षेपूर्वी विद्यार्थ्यांना सराव करता यावा, यासाठी २३ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर या पाच दिवसांत दररोज एक सराव परीक्षा घेण्यात येणार आहे. प्रत्येक परीक्षा ९० मिनिटांची असेल.

या सराव परीक्षांमुळे विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका सोडविण्याचा अनुभव मिळेल. परीक्षेची भीती कमी होईल, वेळेचे नियोजन करता येईल आणि आत्मविश्वास वाढेल. विशेष म्हणजे, या सर्व परीक्षा विद्यार्थ्यांसाठी पूर्णपणे मोफत आहेत.

विद्यार्थ्यांनी विज्ञान विषय समजून घ्यावा, त्यांची विचार करण्याची क्षमता वाढावी आणि भविष्यात विविध स्पर्धा परीक्षांना चांगल्या प्रकारे सामोरे जावे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

संस्थेचे **(पान २ वर)**

धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत लक्ष्मी जनार्धन मुंडे यांच्या अमृतदिनानिमित्त टोकवाडीत भव्य 'माय महोत्सव'!

परळी (प्रतिनिधी)टोकवाडी येथील आई लक्ष्मी जनार्धन मुंडे यांच्या अमृतदिनानिमित्त रविवार, दि. २२ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता भव्य 'माय महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक, धार्मिक आणि समाजोपयोगी उपक्रमांची पर्वणी नागरिकांना अनुभवता येणार आहे. या कार्यक्रमासाठी राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

महोत्सवाचे विशेष आकर्षण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचे भूमिपूजन, श्री तुळजाभवानी मंदिरासाठी दरवाजांचे अर्पण, सामाजिक कार्यासाठी 'माय पुरस्कार' प्रदान आणि भव्य बक्षीस वितरण सोहळा. आईच्या अमृतदिनाचे औचित्य साधून समाजहिताचे उपक्रम राबविण्याचा आयोजकांचा हा स्तुत्य प्रयत्न आहे. मान्यवरांच्या शुभहस्ते महोत्सवाचे आयोजन

या कार्यक्रमास शुभहस्ते माजी कृषिमंत्री महाराष्ट्र राज्य मा. आ. धनंजयजी मुंडे , माजी खासदार बीड मा. खा. प्रितमताई गोपीनाथराव मुंडे, माजी विधान परिषद सदस्य महाराष्ट्र राज्य **(पान २ वर)**





बीड * वर्ष ०१ ले * अंक ०३ * रविवार जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक रविवार जगमित्र कार्यालय, 'जगमित्र' बाजीप्रभू नगर नेहरू चौक (तळ) परळी वैजनाथ ४३१५१५ जि.बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (साप्ताहिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.* पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) ई-मेल-jagmitra2010@gmail.com
कार्यकारी संपादक : बिलाल शेख मो.नं.९४२२४०४७४०
PRGI.No.MHMAR/25/A3358
Beed * Year 01 * Issue 03 * Sunday Jagmitra was printed by Balasaheb Jijaram Kadbane, printer, publisher, owner and editor of Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli. Published at Weekly Sunday Jagmitra Office, 'Jagmitra' Bajiprabhu Nagar Nehru Chowk (Bottom) Parli Vaijnath 431515 Dist. Beed (Maharashtra). (Editors do not necessarily agree with the textual news of the daily.e-mail-jagmitra2010@gmail.com Executive Editor : Executive Editor: **Bilal Shaikh Mo.No.9422404740**
PRGI.No.MHMAR/25/A3358